❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



भारतीय शिक्षण व्यवस्थेचा प्राचीन वारसा जपणे गरजेचे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदेचा नागपुरात समारोप

■ नागपूर (दै. संध्या)

भारतातील प्राचीन शिक्षण व्यवस्था अतिशय महान असून येथे तक्षशिला, नालंदा, विक्रमशिलासारखी विद्यापीठे अस्तित्वात होती. जगाच्या कानकोपऱ्यातून विद्यार्थी येथे ज्ञानार्जनासाठी येत. हे प्राचीन ज्ञान एवढे वैशिष्ट्यपूर्ण होते की तेव्हाही भारत जागतिक व्यापार, जीडीपी व निर्यातीतही वर्चस्व गाजवत होता. वर्तमानात दिशादर्शक ठरणाऱ्या प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेचा वारसा जपणे ही येणाऱ्या पिढीची मोठी जबाबदारी व काळाचीही गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ९ व्या आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषदेच्या समारोपीय समारंभात बोलत होते. मिहान येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट(आयआयएम) येथे आयोजित या कार्यक्रमास शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, माजी खासदार डॉ. नितीश भारद्वाज यांची विशेष उपस्थिती होती. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ.भीमराया मेत्री, द साऊथ पब्लिक स्कूलच्या प्राचार्य डॉ. मृणालिनी दस्तुरे, सनफ्लॉवर व तायची पब्लिशिंगचे व्यवस्थापकीय संचालक राजेश घई, नवनीत प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष (एज्युकेशनल बुक्स डिव्हिजन) देविश गाला, द साऊथ पब्लिक स्कूलचे संचालक दिवेन दस्तुरे, न्यू सरस्वती हाऊसचे नॅशनल सेल्स हेडचे प्रमुख विरल उपाध्याय, एड्युव्हेटचे प्रमुख नुपूर मराठे आणि ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे सहयोगी संचालक रविशंकर रथ आदी यावेळी उपस्थित होते.



प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीची महानता सांगताना श्री. फडणवीस यांनी आचार्य चाणक्य, पाणिनी या विद्वानांचे व त्यांच्या ग्रंथाचे दाखले दिले. ते म्हणाले, पूर्वी शिक्षणाची प्रणाली 'शास्त्र' व 'संवाद' रुपात होती. ज्ञान केवळ सैद्धांतिक नव्हते तर उपयोजित व कौशल्य-आधारित होते. त्यातूनच राष्ट्रीय, सामाजिक व वैयक्तिक विकास साधता येतो. 'एआय'च्या युगात मानवी मूल्ये, नीतिमत्ता व चारित्र्य जपण्याची मोठी जबाबदारी नव्या पिढीवर असून आपल्या शिक्षण प्रणालीचा केंद्रबिंदू असलेल्या विद्यार्थ्यांभोवतीच्या अनेक चर्चा आपण ऐकतो. या परिषदेने 'जनरेशन वॉव' (वर्ल्ड ऑफ वंडरफुल जनरेशन) ही नवी संकल्पना मांडली असून 'झेन झी' किंवा 'जेन अल्फा' पेक्षा ती निराळी आहे. ही पहिली पिढी आहे, जी माहितीच्या स्फोटासोबत जन्माला आली व तंत्रज्ञानाच्या स्फोटासोबत वाढत आहे. 'मिलेनियल्स' अशी पिढी आहे की ज्यांच्या आयुष्याचा नंतरचा भाग विकसित तंत्रज्ञानासोबत जात आहे. 'जनरेशन वॉव'कडे प्रचंड प्रमाणात माहिती व अफाट उगमस्थाने आहे. त्याचे ज्ञानात रूपांतर करण्याची व त्याचा विचारपूर्वक वापर करण्याची दुहेरी जबाबदारी या पिढीवर आहे. ज्ञान हे त्या माहितीवर प्रक्रिया करण्याचे शहाणपण आहे. त्या माहितीला एक नैतिक स्वरूप देणे, योग्य-अयोग्य ओळखणे व संवेदनशीलतेने ते आचरणात आणणे हेच आज खरे आव्हान आहे.

सध्याच्या माहितीच्या स्फोटाच्या काळात वावरणाऱ्या पिढीला उपलब्ध माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याचे शहाणपण अंगी बाणवता आले पाहिजे. सध्याच्या काळात शिक्षक – अध्यापकांची भूमिका ही विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यापेक्षा त्यांच्या विचार प्रक्रियेला योग्य तो आकार देण्याची असली पाहिजे. माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्यासाठी आवश्यक ती सखोल चर्चा व मंथन या परिषदेच्या माध्यमातून करण्यात येत असल्यामुळे ही परिषद महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. फडणवीस म्हणाले, अनेक आक्रमणांमुळे आपल्या देशातील विद्यापीठे व व्यवस्था कोलमडली. विल्यम ॲडम यांच्या सर्वेक्षणानुसार बंगाल, बिहार, पंजाब राज्यांमध्ये लक्षावधी शाळा होत्या. मद्रास प्रेसिडेन्सीमध्ये हजारो व्याकरणशाळा होत्या. आपल्यावर राज्य करणाऱ्यांच्या ह्या नोंदी आहेत. यावरून प्राचीन भारतातील शैक्षणिक समृद्धता लक्षात येते. परंतु ही शैक्षणिक पद्धती व प्रणाली दीर्घकाळ टिकू शकली नसली तरी येथील समाज सुधारकांनी घडवून आणलेल्या क्रांतीने येथे शिक्षणाची बीजे पुनःश्च रोवल्या गेली. त्यातून आपण विकास साधत आहोत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत या क्षेत्रात अनेक नवीन पद्धतींचा अवलंब करण्यात येत आहे. आपण आपले लक्ष आता नव्या पिढीवर केंद्रित केले पाहिजे. तंत्रज्ञानाचा वापर करणे आपल्याच हातात असून आपण या नव्या पिढीची नवी जडणघडण करायला हवी. मातृभाषेची कास आपण सोडता कामा नये कारण विकसित देशांची शिक्षण प्रणाली त्यांच्या मातृभाषेत आहे. नवीन शैक्षणिक धोरणात याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तंत्रज्ञानाच्या आहारी जाण्यापेक्षा ते वापरण्याचे कौशल्य आपण आत्मसात केले तर सर्वांगीण विकास साधता येणे शक्य आहे, असा विश्वास श्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

थोडक्यात...



श्रीकांत शिंदेचा टोला

मुंबई : दैनिक संध्या

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी एका ऑडिओ क्लिप माध्यमांसमोर दाखवली. त्यात भाजपने श्रीकांत शिंदे यांच्याकडून जरांगेंकडे ५०० कोटी रूपये पोहचवल्याचा दावा करण्यात आला होता. यावर आता एकनाथ शिंदे यांचे सुपूत्र श्रीकांत शिंदे यांची प्रतिक्रिया आली आहे. त्यांनी मिश्किल टोला लगावत त्या ५०० कोटींचा मी देखील शोध घेत आहे असा दावा केला. माध्यमांशी बोलताना श्रीकांत शिंदे म्हणाले, 'जरांगेंना पडलेला प्रश्न मला देखील पडला आहे. 500 कोटी बाबत मी देखील शोध घेतोय. 500 कोटी एकत्र कसे दिसतील हीच चर्चा आम्ही करत होतो.' ज्यासोबत पैसे पाठवले तो माझ्यापर्यंत पोहचलाच नाही. तो गेला कुठे याचा मी शोध घेतोय. असा मिश्किल टोला देखील त्यांनी लगावला. थोडी थट्टा केल्यानंतर शिंदे यांनी मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. लवकरच सत्य बाहेर येईल. असे म्हणत दोन दिवस मी देखील ते पैसे शोधायला चाललो आहे. आमचा रिसर्च सुरू आहे. आम्ही देखील ५०० रूपये एकत्र कसे दिसतील अन् त्यासाठी किती गाड्या लागतील याचा शोध घेत आहोत. तुम्हाला देखील काही कळालं तर सांगा असा टोला लगावला.

कारकुनाने क्लिप मोठ्या माणसाला दिली : कडू

पुणे : दैनिक संध्या

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी समोर आणलेल्या कथित 500 कोटींच्या ऑडिओ क्लिपवरून महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा गदारोळ माजला असताना, शिवसेना नेते बच्चू कडू यांनी या प्रकरणावर अत्यंत खळबळजनक भाष्य केले आहे. "500 कोटींचा एवढा मोठा आकडा हा निव्वळ स्वतःचा मोठेपणा दाखवण्याचा आणि बडेजाव मिरवण्याचा प्रकार आहे. एका कार्यालयातील कारकुनाने अनेक ऑडिओ रेकॉर्डिंग गोळा करून त्या एका मोठ्या माणसाच्या हाती दिल्या आहेत. हा 'झारीतील शुक्राचार्य' नेमका कोण आहे, हे शोधून काढण्याची गरज आहे. या संपूर्ण प्रकारातून भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांचीही बदनामी करण्याचे पद्धतशीर प्रयत्न झाले आहेत," असा थेट दावा बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे. पुणे येथे पत्रकारांशी संवाद साधताना बच्चू कडू यांनी या ऑडिओ क्लिपची पार्श्वभूमी, प्रसारमाध्यमांचे वार्तांकन, दुष्काळी परिस्थिती, नागपूरमधील घटना आणि महायुतीतील अंतर्गत समीकरणांवर अत्यंत परखड भूमिका मांडली.

जंतर मंतर हिंसाचार प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाची समिती करणार!

२९-३० ऑक्टोबर रोजी नोंदवण्यात येणारे जबाब

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

जंतर मंतर येथे जुलै महिन्यात झालेल्या निदर्शनादरम्यान झालेल्या पेलेट गनच्या गोळीबाराचे, महिला आंदोलकांना दिलेल्या गैरवर्तनाचे आणि पोलिसांच्या कथित अत्याचारांचे आरोप तपासणारी सर्वोच्च न्यायालयाची उच्चस्तरीय समिती, २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी पीडित व्यक्तींचे जबाब नोंदवून घेणार आहे.

समितीने सर्वसामान्य नागरिक, प्रत्यक्षदर्शी आणि पीडितांना तक्रारी, लेखी जबाब आणि पुरावे सादर करण्याची संधी दिली आहे. दोन्ही दिवशी सकाळी ११:३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत समितीच्या कार्यालयात पुरावे सादर करता येतील.

समितीची बैठक सकाळी ११:०० वाजता नवी दिल्ली येथील १७ राऊस ॲव्हेन्यू इन्स्टिट्यूशनल एरियामधील शिक्षा सदन येथील कार्यालयात होईल. उपस्थित राहणाऱ्यांनी वैध ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. तक्रारी आणि संबंधित कागदपत्रे समितीच्या hpec.nic.in समिती पेलेट गनचा कथित वापर, महिला आंदोलकांना लक्ष्य करणे व त्यांच्याशी गैरवर्तन करणे आणि आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचाराची चौकशी करेल. तसेच, दोन्ही बाजूंकडून झालेल्या अतिरिक्त पोलीस बळाचा वापर आणि मालमत्तेच्या नुकसानीच्या आरोपांचीही तपासणी केली जाईल. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करताना पाच सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समितीची स्थापना केली. या समितीचे अध्यक्ष



सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी आहेत. या समितीत पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश रवी शंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषी कुमार शुक्ला आणि मेघालयाचे माजी पोलीस महासंचालक एल. आर. बिश्नोई यांचाही समावेश आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, २० जुलै रोजी संसद मोर्चादरम्यान सुरक्षा दल आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधूर आणि लाठीचार्जचा वापर केला. पेलेट गनच्या संभाव्य जखमांमुळे काही विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने समितीला साक्षीदारांची सुरक्षा आणि त्यांच्या ओळखीची व जबाबांची गोपनीयता सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

अदानींसाठी ६०० एकर जंगल भस्मसात करण्याचा डाव!

विजय वडेट्टीवारांसह रोहित पवारांचे सरकारवर गंभीर आरोप, म्हणाले - मंत्र्यांच्या लाडासाठी ४२ कोटींची अतिरिक्त उधळपट्टी

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य एका बाजूला भीषण दुष्काळात होरपळत असताना आणि शेतकरी जगण्यासाठी संघर्ष करत असताना, नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी निर्लज्ज महायुती सरकारकडून कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी सुरू असल्याचा संतप्त आरोप काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. मूळ 86.90 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तब्बल 42.15 कोटी रुपयांची वाढ करण्यात आली असून, शासकीय खर्चात 20 टक्के कपात करण्याचे नियम केवळ सामान्य जनतेसाठीच आहेत का, असा सवाल त्यांनी केला आहे. दुसरीकडे, उद्योजक अदानी आणि 'टोरंट पॉवर' कंपनीच्या फायद्यासाठी भीमाशंकर व कर्जत परिसरातील तब्बल 600 एकर (233 हेक्टर) घनदाट जंगल उद्ध्वस्त करण्याचा घाट घातला जात असल्याचा खळबळजनक आरोप विजय वडेट्टीवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार यांनी केला आहे. सायडोंगर वनक्षेत्रातील 32 हजारांहून अधिक झाडांची कत्तल सुरू असून, यामुळे लाखो मुके पशु-पक्षी, शेकरू यांसारखे वन्यजीव बेघर होत असल्याचा आक्रमक सूर दोन्ही नेत्यांनी लावला आहे.

हिवाळी अधिवेशनाच्या खर्चात करण्यात आलेल्या वाढीवरून विजय वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरले आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या आयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या मूळ 86.90 कोटी रुपयांच्या खर्चात थेट 42.15 कोटी रुपयांची भरघोस वाढ करण्यात आली आहे. एकीकडे दुष्काळग्रस्तांना मदतीच्या नावाखाली 5 हजार रुपयांची तुटपुंजी मदत



द्यायची आणि दुसरीकडे मंत्र्यांच्या ऐशआरामावर पाण्यासारखा पैसा उधळायचा, हा थेट महाराष्ट्रातील जनतेचा अपमान आहे. भीमाशंकर परिसरातील नियोजित जंगलतोडीवरून वडेट्टीवार यांनी सरकारवर तोफ डागली आहे. अदानी समूहाच्या प्रकल्पासाठी भीमाशंकर परिसरातील तब्बल ६०० एकर समृद्ध जंगल तोडण्याचा घाट घातला जात असेल, तर हा विकास नसून महाराष्ट्राच्या नैसर्गिक संपत्तीवर घातलेला मोठा घाला आहे. एकीकडे आदिवासींच्या विकासाच्या पोकळ घोषणा करायच्या आणि दुसरीकडे त्यांची जमीन, संस्कृती व जगण्याचा आधार हिरावून घ्यायचा, हे कोणत्या न्यायात बसते? आदिवासींचे जंगल म्हणजे केवळ झाडे नसून त्यांच्या पिढ्यान्पिढ्यांच्या अस्तित्वाचा तो आधार आहे. उद्योगसमूहांच्या हितासाठी हा आधार उद्ध्वस्त करू देणार नाही. या जंगलतोडीमुळे आधीच गंभीर असलेला मानव आणि वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होईल. वन्यजीवांचा अधिवास नष्ट करून सर्वसामान्य जनतेचा जीव धोक्यात घालणार का, असा सवाल त्यांनी केला. महाराष्ट्राची जंगले ही कोणत्याही उद्योगसमूहाला आंदण देण्यासाठी ठेवलेली खासगी मालमत्ता नाही, असा इशारा त्यांनी दिला. याच मुद्यावर आक्रमक होत आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरील (X) विस्तृत पोस्टमध्ये कर्जत तालुक्यातील विनाशाचे भयानक चित्र मांडले आहे. कर्जत तालुक्यात सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या भीमाशंकर अभयारण्याला लागून असलेल्या सायडोंगर वनक्षेत्रात पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पासाठी 233 हेक्टर क्षेत्रातील तब्बल 32 हजारांहून अधिक घनदाट झाडांची कत्तल सुरू आहे. कागदावर हा आकडा 32 हजार दिसत असला तरी प्रत्यक्षात तो लाखापर्यंत जाईल. यादरम्यान घरट्यातील पिल्ले, अंडी आणि हजारो-लाखो मुक्या पक्षांचा आकांत कुणालाही ऐकू येत नाहीये, हे दुर्दैव आहे. या प्रकल्पासाठी डोंगरांमध्ये शक्तिशाली सुरुंगाचे स्फोट केले जाणार आहेत, ज्यामुळे संपूर्ण डोंगराचा भाग कमकुवत होऊन भविष्यात माळीण किंवा इर्शाळवाडीसारख्या भयंकर दरड कोसळण्याच्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

कपातीचे नियम फक्त जनतेसाठीच का?

शासकीय खर्चात 20 टक्के कपात करण्याचे पोकळ नियम फक्त सामान्य जनतेसाठीच आहेत का, असा सवाल करत वडेट्टीवार यांनी, हे अधिवेशन जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आहे की सत्ताधाऱ्यांचे लाड पुरवण्यासाठी, असा घणाघाती प्रश्न विचारला आहे. आधी दुष्काळाने होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना सरसकट न्याय द्या, प्रशासकीय कपातीचे नियम स्वतःला लागू करा आणि उधळपट्टी थांबवा, अशी मागणी त्यांनी केली.

मला बदनाम करण्यासाठी ५०० कोटींचा घाट का घातला?

मनोज जरांगेंचा संतप्त सवाल; ऑडिओ क्लिप खरीच असल्याचा दावा

■ जालना (दै. संध्या)

मराठा आंदोलन चिरडण्यासाठी आणि आपल्याला बदनाम करण्यासाठी 500 कोटी रुपयांचा घाट का घातला, असा सवाल मनोज जरांगे यांनी उपस्थित केला आहे. समाजातील तरुणांना ईडी आणि एसआयटीच्या धमक्या देऊन फोडण्याचे षड्यंत्र रचले जात असल्याचा आरोप करत, या संपूर्ण प्रकरणाच्या मुळाशी जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सत्य बाहेर काढतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, व्हायरल होत असलेली ऑडिओ क्लिप 'एआय'ने बनवलेली नसून ती खरी आहे आणि पृथ्वीराज चव्हाण, राज ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनीही याची दखल घेतली असल्याचे सांगत जरांगे यांनी या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करण्याचा स्पष्ट इशारा दिला आहे.

मनोज जरांगे म्हणाले, माझा विषय एवढाच आहे की तुम्ही मला 500 कोटी देण्याचा आणि बदनाम करण्याचा घाट का घातला? तुम्ही आंदोलन दाबण्याचा चिरडण्याचा डाव का रचला? माझ्यासाठी हे महत्त्वाचं आहे. तुम्ही इतके का द्वेषाने



पेटून उठलात की मराठा समाजाचं आंदोलन बंद पडलं पाहिजे म्हणून 3 वर्षांपासून तुम्ही मोठ मोठाले संकट माझ्या पुढं उभा करत आहात, याचं कारण काय? माझ्यासाठी हे महत्त्वाचं आहे.

पुढे मनोज जरांगे म्हणाले, आमचे लोकं फुटत नसूनही तुम्ही दादागिरीने फोडले, धमक्या देऊन फोडले. महाराष्ट्रातले मराठ्यांचे पोरं इमानदारीने काम करत आहेत, त्यांना ईडीच्या, एसआयटीच्या धमक्या देऊन तुम्हाला बरबाद करतील, तुम्हाला संपवून टाकतील आरामाचं जीवन जगायला शिका, काय असतं त्या मराठ्यात, काय खरं असतं, कोण कोणाचा समाज आहे, हीच वेळ असते संधी साधून सोनं करायची, कोण कोणासाठी येतं, तुम्ही सरकार म्हणतंय तुम्ही त्याच्या विरोधात बोला, नाही बोलले तर चौकश्या लागतील. शेवटी दबावापोटी माणसं खचून जातेत. असं करून तुम्ही षड्यंत्र का केलं? माझ्यासाठी हे महत्त्वाचं आहे की तुम्ही पार्टी फंड माझ्या विरोधात वापरायला लागलात. तुम्ही हे आंदोलन बदनाम करण्यासाठी नको ते केलं. ती क्लिप ऐकली तर डोकं उजाडेल. किती भयानक कट रचले जातात. तोंडावर गोड बोलतात आणि पाठीमागे हे असं करतात. आता समाजासमोर आले आहे.

एकनाथ शिंदे साहेब याच्या मुळाशी जातील

मनोज जरांगे म्हणाले, आपले जरी लोकं असतील तरी त्यांना सोडले नाही पाहिजे. मोर्चे काढायला लावायचं, खोट्या बातम्या पसरवल्या, त्याची बदनामी करा म्हणून सांगतात, हे सगळे डाव आखले आहेत त्यात. याचा छडा लागला पाहिजे. आम्हाला विश्वास आहे की एकनाथ शिंदे साहेब याच्या मुळात जातील, राजकारण हा नंतरचा भाग आहे. पण ते मुळात जातील आणि राज्याला नवीन संदेश देतील की आमचे जरी असले तरी सोडत नाही. म्हणून मी महिनाभर काहीच बोलणार नाही त्यांना. मी इमानदारीने काम करतो म्हणून माझ्या पावला पावलावर संकट आहे. मी या दुःखातून पायवाट काढत आहे, माझ्या समाजासाठी. माझ्या समाजाच्या लेकरांवर कधी संकट येऊ नये म्हणून मी झटत आहे. माझ्या घरावर सुद्धा ते हल्ला करू शकतात. रामदास कदम यांना काळालं आहे म्हणून त्यांनी धडाधड नावं घेतले, उदय सामंत साहेबांनी नावं घेतले, त्यांना वाटत आहे की हे सत्य आहे.

सुषमा अंधारेंचा एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मनोज जरांगे पाटील यांनी ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपवरून मोठी चर्चा सुरू आहे. या क्लिपच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सत्ताधारी नेत्यांवर जोरदार टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांच्याविरोधात कथित फेक नरेटिव्ह तयार करण्याबाबत चर्चा झाल्याचा आरोप करत अंधारे यांनी या प्रकरणावर संताप व्यक्त केला. तसेच, शिंदे-फडणवीस यांना उद्देशून 'कर्मा रिटर्न्स' असा इशाराही त्यांनी दिला. या ऑडिओ क्लिपमुळे राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे.

मनोज जरांगे यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत ऑडिओ क्लिपचा काही भाग ऐकवला होता. त्यानंतर सुषमा अंधारे यांनी सुरुवातीला या क्लिपचा सुमारे दीड मिनिटांचा भाग ऐकल्याचे सांगितले. मात्र, त्यानंतर संपूर्ण 30 ते 32 मिनिटांची ऑडिओ क्लिप ऐकल्यानंतर आपल्याला धक्का बसल्याचे त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले.

या क्लिपमध्ये सुशील कुलकर्णी आणि अतुल भातखळकर यांच्यासह काही व्यक्ती उद्धव ठाकरे यांच्याबाबत कथित फेक नरेटिव्ह कसे तयार करता येईल, यावर चर्चा करत असल्याचा



आरोप अंधारे यांनी केला. एखाद्या राजकीय नेत्याची प्रतिमा मलिन करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करण्याबाबत चर्चा झाल्याचा दावाही त्यांनी केला. अंधारे यांच्या मते, एखाद्या व्यक्तीविरोधात सातत्याने चुकीची माहिती पसरवून जनमत प्रभावित करण्याची रणनीती आखली जात असल्याचे या ऑडिओ क्लिपमधून दिसते. मात्र, क्लिपमधील संभाषणाची सत्यता आणि त्यातील व्यक्तींची ओळख स्वतंत्रपणे पडताळणे आवश्यक आहे. सुषमा अंधारे यांनी आपल्या पोस्टमध्ये उद्धव ठाकरे यांच्याविरोधात कथित बदनामीची मोहीम राबवण्याच्या प्रयत्नांवर आक्षेप घेतला. विविध यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून चुकीचे कथानक पसरवण्याची रणनीती आखली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

संपादकीय

जरांगे पाटलांची ध्वनिफीत?

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केलेल्या ऑडिओ क्लिप वरून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले, असून त्यावरून सत्ताधारी महायुती मधील वाढत्या वेबनावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाचे फॉरेन्सिक चौकशीचे आदेश दिले,दरम्यान शिवसेना नेते रामदास कदम यांनी भाजपमधील काही मंडळींवर उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संपवण्यासाठी मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांच्याशी संगनमत केल्याचा आरोप केला आहे,राज्यातील मराठा आंदोलन हे केवळ आरक्षणासाठी हे आंदोलन नाही, तर त्यामागे सामाजिक न्याय, शिक्षण, रोजगार, शेतीचे संकट, आर्थिक विषमता, व राजकीय प्रतिनिधित्व, आणि बदलत्या ग्रामीण समाज व्यवस्थेचे अनेक पैलू आहे, राज्याच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर या आंदोलनाने प्रभाव टाकला असल्याने अडचणीच्या आंदोलनाचा केव्हा एकदा शेवट होतो, असे सरकारला वाटणे स्वाभाविक आहे, त्याचप्रमाणे हे आंदोलन सरकार अडचणीत येईपर्यंत कसे सुरु राहील, असे विरोधकांनाही वाटत असेल, अशा परिस्थितीत मनोज जरांगे पाटील यांनी आपले मराठा आंदोलन मोडीत काढण्यासाठी आपल्याला ५०० कोटी रुपये दिल्याचा दावा करणारी ध्वनीफीत उघड केल्याने राज्याच्या राजकारणात अस्वस्थता निर्माण झालेली आहे, ध्वनिफितीचा मराठा आंदोलन दडपण्यासाठी व संपवण्यासाठी शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून ५०० कोटी रुपये जरांगे पाटील यांना देण्यात आल्याचा दावा करणारे सत्ताधारी भाजपचे काही आमदार, आणि इतर नेतेमंडळी आहेत, मनोज जरांगे पाटील यांचा रोख एकनाथ शिंदे यांच्यावर आहे, आपल्या आंदोलनाचे विरोधात गेल्या तीन वर्षापासून षडयंत्र रचले जात असून या आंदोलनात बाधा आणण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या क्लिपने जनतेच्या मनात संभ्रम निर्माण केला आहे, सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या अंतर्गत बैठकीची ही क्लिप मनोज जरांगे यांच्यामार्फत कोणी आणि कोणत्या उद्देशाने पोचवली असावी, हा पहिला प्रश्न आहे, भाजपने तर ही एआयच्या सहाय्याने फेरबदल केलेली ध्वनिफीत असावी, असा आभासी संशय व्यक्त करत थेट या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे, शिवसेनेच्या भूमिकेत शिंदे पिता पुत्राची प्रतिमा सावरण्याची निकड, तर भाजपच्या भूमिकेत ध्वनिफितीची सत्यता, आणि प्रसाराचा स्त्रोत तपासण्यावर भर दिसत आहे, भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी ५०० कोटी दिल्याचा दावा फेटाळून लावला आहे, तर आपल्याला ही रक्कम दिलेली नसताना आपली बदनामी का केली जाते?.. हा मनोज जरांगे यांचा सवाल आहे,सर्वांच्या म्हणण्यानुसार देवानघेवाणीचा व्यवहार झालाच नसेल तर मग हा दावा कोणी आणि का केला?हा प्रश्न शिल्लक राहतो, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केल्याने सत्ताधाऱ्यापुढे व्यवहाराचा पुरावा, आणि ध्वनिमुद्रांचा उगम, शोधण्याचे दोन स्वतंत्र प्रश्न उभे आहेत, नाही म्हटले तरी मराठा आंदोलनाचे दडपण सरकारवर आहे, कारण सप्टेंबर २०२६ मध्ये वीस दिवसाचे उपोषण संपवताना जरांगे पाटील यांनी महायुती सरकारला तीन महिन्यांची मुदत दिली, त्यामुळे अद्यापही मराठा आंदोलनाचा दबाव संपलेला नाही, २०२४ ला मराठा समाजाला दहा टक्के सामाजिक, आणि शैक्षणिक आरक्षण देणाऱ्या कायद्याला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे, आणि त्याची सुनावणी नव्याने सुरू झाली आहे, यापूर्वीचा २०१८ चा कायदा सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के मर्यादे पलीकडे जाण्यास अपवादात्मक आधार नसल्याने रद्द केला होता, कुणबी प्रमाणपत्राचा मार्ग जुन्या नोंदी, आणि वंशावळ सिद्ध करण्याची जोडलेला आहे, पात्र कुटुंबांना त्यातून विद्यमान ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळू शकतो, पण सरसकट प्रमाणपत्राचा प्रश्न कायदेशीर कसोटीत अडकतो. मराठा समाजाला एकच राजकीय मत असलेली एक गट समजणे चुकीचे, त्याचवेळी ओबीसी समाजाच्या विद्यमान आरक्षणावर परिणाम होईल? या चिंतेकडे दुर्लक्ष करता येणार नाही, सरकार समोर राजकीय आश्वासने, न्यायालयीन मर्यादा, आणि विविध समाज घटकाच्या अपेक्षा, एकाच वेळी उभ्या ठाकल्या आहेत, आरक्षणाचा प्रश्न केवळ मतपेटीचे गणित नाही, तो संधीच्या वाटपावरचा दीर्घ सामाजिक प्रश्न आहे. त्यातच आपल्याकडे आणखीही काही ध्वनिफिती असून त्या उघड केल्यास २०२९ च्या निवडणुकीत राजकीय वारे फिरवेल असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटल्याने सत्ताधारी पक्षात अस्वस्थतेचे वातावरण आहे,पुढची कसोटी तपासाची आहे, मूळध्वनीमुद्रण, त्याचा स्त्रोत, आवाजाचे नमुने, संपादन, किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेची शक्यता,आणि संभाषणाचा पूर्ण संदर्भ, तपासला गेला पाहिजे. पाचशे कोटीचा व्यवहार खरोखरच झाला का?...हे ठरवण्यासाठी ध्वनिफितीतील वाक्य पुरेसे नाही, त्यासाठी स्वतंत्र आर्थिक पुरावे लागतील. ध्वनिफीत अस्सल व खरी निघाली तर संबंधिताची जबाबदारी निश्चित व्हावी, बनावट निघाली तर कोणी?आणि कशासाठी? तयार केली, हे उघड व्हावे. केवळ चौकशी सुरू आहे, असे मोघम बोलणे पुरेसे नाही, त्याचे निष्कर्ष पारदर्शकतेने जनतेसमोर ठेवणे गरजेचे आहे. शेवटी सरकारची खरी कसोटी एका ध्वनिफितीचे खंडन किंवा समर्थन करणे नाही, आणि ते पुरेसे नाही.आरक्षणाच्या प्रश्नावर कायदेशीर आणि सर्व घटकांचा विश्वास राखणारा मार्ग दाखवणे हे आहे, क्लिप मधील आवाज खरा? की बनावट?ही प्रयोगशाळा ठरवेल, सत्ताधारी महायुती सरकार प्रामाणिक आणि भरवशाचे आहे की नाही? हे सरकारची कृतीवरून सर्वसामान्य जनता ठरवतील, सध्या राजकारणी आणि समाजकारणी यांनी अक्षरशः सारे संकेत आणि लाज सोडून दिले असे दिसत आहे, आरोप प्रत्यारोपाचा गलिच्छ प्रवास खोक्यापासून सुरू होऊन आता थेट पाचशे कोटी रुपया पर्यंत पोहोचला आहे, मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी झटणाऱ्या महत्त्वाच्या नेत्याकडून माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्र्याबाबत गंभीर आरोप होत आहेत, त्यानंतर समर्थकांकडून प्रत्यारोपाचा धडाका सुरू होतो, आपण उपमुख्यमंत्र्यांच्या किती जवळचे आहोत हे दाखवण्यासाठी केविलवाणी धडपड केली जाते. या सर्व प्रकारातून केवळ राजकीय फायदा मिळवण्याचे दुष्टचक्र थांबत नसेल तर सामान्य जनतेने आता गप्प का बसावे, एकीकडे शेतकऱ्यापासून सामान्य नागरिकांपर्यंत भयंकर दुष्काळाचे छायाचित्र पोहोचलेले आहे, तर दुसरीकडे त्यावर सत्ताधारी मंत्री ब्र काढायलाही तयार नाहीत,नेत्यावर किरकोळ आरोप झाले की मात्र प्रतिदावे आणि वक्तव्याची सरबत्ती सुरू होते, समाज त्यांच्याकडे आशेने पाहतो, त्यांनी जेव्हा सत्तेच्या मोहात लाज सोडली असेल तेव्हा जनतेने देखील आता का लाज बाळगावी?आणि मूग गिळून का गप्प बसावे?हा खरा आजचा यक्षप्रश्न आहे.



३ तरुणांच्या आवळल्या मुसक्या

आंबेगाव पोलिसांनी ताब्यात घेतलेले तीन संशयित

1. रुद्र दादासाहेब बारवकर (वय १९) – रा. म्हस्के चाळ, जैन मंदिर रोड, संतोषनगर, कात्रज, पुणे.
2. अनिकेत प्रताप नरवडे (वय १९) – रा. खंडाळे, रांजणगाव, ता. शिरूर, पुणे.
3. सौरभ गोरख चौधरी (वय २४) – रा. संतोषनगर, कात्रज, पुणे.

■ आंबेगाव (दै. संध्या)

आर्थिक व्यवहाराच्या वादातून एका व्यक्तीवर पिस्तुलातून गोळीबार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी नवी मुंबईतील तळोजा पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील तीन वाँटेड संशयितांना पुण्यातील आंबेगाव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दत्तनगर परिसरात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली असून, तिघांनाही पुढील तपासासाठी नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे १ वाजून १७ मिनिटांच्या सुमारास रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील तळोजा फेज-२ येथे शिवाजी चौकाजवळील मारवा बिल्डिंगखाली ही घटना घडली.

आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेल्या वादात आरोपींनी फिर्यादीला कथितपणे मारहाण केली. त्यानंतर पिस्तुलातून गोळीबार करून त्यांना गंभीर जखमी केले आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५३७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) सह विविध कलमे, शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलिस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तळोजा येथील गोळीबार प्रकरणातील पाहिजे असलेले संशयित पुण्यातील दत्तनगर परिसरात असल्याची माहिती आंबेगाव पोलिस ठाण्याच्या तपास पथकातील पोलिस अंमलदार धनाजी धोत्रे आणि सचिन गाडे यांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे आंबेगाव पोलिसांच्या तपास पथकाने तत्काळ दत्तनगर परिसरात धाव घेतली.

पोलिसांनी संबंधित ठिकाणी सापळा रचून तिन्ही संशयितांना ताब्यात घेतले. त्यानंतर तिघांनाही पुढील कायदेशीर कारवाईसाठी नवी मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

माळेगाव कारखान्याच्या पहिल्या साखरपोत्यांचे पूजन

यावर्षी गेट केन धारकांना ३५०० दर देणार



■ माळेगाव (बारामती) (दै. संध्या)

माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या यावर्षीच्या गाळप हंगामाचा श्री गणेशा उपमुख्यमंत्री तथा कारखान्याच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार व उपाध्यक्ष नितीन शेंडे यांच्या हस्ते करण्यात आला.तर या गाळप हंगामात उत्पादित झालेल्या पहिल्या पाच साखर पोत्यांचे पूजन कारखान्याचे उपाध्यक्ष नितीन शेंडे व संचालकांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना नितीन शेंडे म्हणाले की,यावर्षी दुष्काळाची परिस्थिती असून 13 लाख मॅट्रिक टन गाळप करण्याचे नियोजन आहे सभासदांचा ७ लाख मॅट्रिक टन तर गेट-केनधारकांचा6लाख मे.टनऊस गाळप करण्यात येणार आहे.दररोज नऊ ते साडेनऊ हजार मॅट्रिक टन गाळप करण्याचे तोडणी वाहतूकीचे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी स्वप्निल जगताप यांनी सांगितले की अध्यक्षांच्या सूचनेनुसार संचालक मंडळांने फलटण,इंदापूर,माळशिरस व दौंड तालुक्यातील गावागावात जाऊन ऊस उत्पादकांच्या बैठका घेऊन त्यांना माळेगावला ऊस घालण्याचे आवाहन केले आहे. नितीन सातव म्हणाले यावर्षी कामगारांनी मशिनरी देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत केली आहेत. त्यामुळे कारखाना वेळेत सुरू झाला आहे. यावेळी अविनाश देवकाते म्हणाले ऊसदरात सभासद व गेटकेनधारक असा भेदभाव न करता ३५०० रुपये प्रति टन दर देण्याचा अध्यक्षांच्या सूचनेनुसार संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे यावेळी ज्येष्ठ संचालक बाळासो तावरे, तानाजी कोकरे, योगेश जगताप, शिवराज जाधवराव, गणपत खलाटे, राजेंद्र बुरुंगले, प्रताप आटोळे, सतीश फाळके, विजय तावरे, देविदास गावडे, रामदास आटोळे, विलास देवकाते, दत्तात्रय येळे, संगीता कोकरे, ज्योती मुलमुले, रतन भोसले, कार्यकारी संचालक जितेंद्र रणवरे, कार्यालयीन अधीक्षक अनिल तावरे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

वाहनावरील बोजा कमी करण्यासाठी आरटीओ कार्यालयात बोलावण्याची सक्ती

■ नारायणगाव (दै. संध्या)

वाहनावरील बोजा नोंद कमी करण्यासाठी वाहनमालकाला प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची सक्ती केली जात असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. ऑनलाइन आणि फेसलेस सेवांमुळे वाहनधारकांना दिलासा मिळत असताना, आरटीओ कार्यालयातील अशा अलिखित नियमांमुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याची तक्रार केली जात आहे. वाहनावरील बोजा नोंद कमी करण्यासाठी वाहनमालकाला कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून आपली ओळख पटवावी लागते. तसेच संबंधित लिपिकासमोर स्वाक्षरी केल्यानंतरच बोजा नोंद कमी केली जाते. त्यानंतर वाहनाचे आरसी बुक टपालाद्वारे घरी पाठवले जाते. मात्र, आधार क्रमांक आणि मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीच्या माध्यमातून वाहनमालकाची ओळख पडताळणी करता येत असल्याने कार्यालयात प्रत्यक्ष बोलावण्याची आवश्यकता काय, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच वाहनावरील बोजा नोंद कमी करण्यासाठी वित्त संस्थेची पडताळणी आवश्यक असते. यासाठी आरटीओ कार्यालयाकडून संबंधित वित्त संस्थेला ई-मेल पाठवून उत्तर मागवले जाते. मात्र, काही वित्त संस्था वेळेत उत्तर देत नसल्याने बोजा नोंद कमी करण्याची प्रक्रिया रखडते.

वडगाव निंबाळकर : अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल



■ वडगाव निंबाळकर (दै. संध्या)

मौजे सोरटेवाडी गावच्या हद्दीत नीरा-बारामती राज्यमार्गावर पवार वस्ती बसस्टॉपजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या अज्ञात वाहनाने पायी चालत जाणाऱ्या व्यक्तीस जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात विकास सिताराम जगताप (वय-५४ वर्षे,रा.साळोबा वस्ती, मुरूम,ता.बारामती,जि.पुणे) यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर २२७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५(अ), १२५(ब), १०६(१) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४, १७ अन्वये अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ०८:४६ वाजण्याच्या सुमारास विकास जगताप हे सोरटेवाडी गावच्या हद्दीतील पवार वस्ती बसस्टॉपजवळ नीरा-बारामती राज्यमार्गावरून पायी चालत जात असताना करंजेपूल चौकाकडून वडगाव निंबाळकरच्या दिशेने जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली.या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली तसेच शरीराच्या इतर भागांनाही गंभीर व किरकोळ दुखापती झाल्या.त्यांना उपचारासाठी साई सेवा मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल,वाघळवाडी येथे दाखल करण्यात आले.मात्र, उपचार सुरू असताना रात्री ०९:५८ वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सदर अपघातानंतर अज्ञात वाहनचालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक वारुळे करीत आहेत.

किकबॉक्सिंगमध्ये ज्ञानसागरची दमदार कामगिरी!

जिल्हास्तरीय स्पर्धेत एक सुवर्ण,दोन रौप्यपदकांची कमाई; तिन्ही खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

■ सावळ (बारामती) (दै. संध्या)



महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा परिषद,पुणे यांच्या वतीने आयोजित शासकीय जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुल,सावळच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत एक सुवर्ण व दोन रौप्यपदकांची कमाई केली. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तिन्ही खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या स्पर्धेत संध्या ताकमोगे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले.तिच्या आत्मविश्वासपूर्ण आणि आक्रमक खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.तसेच सुकृत तुपे याने १७ वर्षे वयोगटातील ७५ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.कृष्णा सूर्यवंशी यानेही १७ वर्षे वयोगटातील ४५ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदकाची कमाई केली.ज्ञानसागरच्या तिन्ही खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवली,ही संस्थेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.सागर माणसिंग आटोळे,व्यवस्थापन,प्राचार्य,क्रीडा विभागातील शिक्षक व प्रशिक्षक यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. "मैदानावरची जिद्द,सरावातील सातत्य आणि विजयाची भूक - याच जोरावर ज्ञानसागरचे खेळाडू सातत्याने यशाची नवी शिखरे गाठत आहेत!"

विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी मोफत रक्तगट तपासणी शिबिर

■ नारायणगाव (दै. संध्या)

विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, त्यांच्यामध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि आपत्कालीन परिस्थितीत रक्तगटाची माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा नगदवाडी ता.जुन्नर येथे इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मोफत रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमाला प्राथमिक आरोग्य केंद्र पिंपळवंडी यांचे सहकार्य लाभले.अशी माहिती नगदवाडी केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या रक्तगटाची तपासणी करून त्यांना स्वतःच्या रक्तगटाची माहिती मिळण्यास मदत झाली.शाळा आणि आरोग्य विभाग यांच्या समन्वयातून राबविण्यात येणारे असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक गरजांची जाणीव वाढविण्यास तसेच आरोग्यदायी समाज निर्मितीस हातभार लावतात. शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ.सत्यम जाधव,लॅब असिस्टंट सयाजी काळे,शुभम बेलदार, मिरा लामखडे व संगिता कुतळ यांचे सहकार्य लाभले. शिबिराचे नियोजन शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर, पंडित चौगुले, निलेश शेलार, विद्या वाघ, आशा आरेकर, उज्वला कांबळे व स्मिता काळे यांनी केले. विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षित भविष्य आणि सर्वांगीण विकास यांना प्राधान्य देणाऱ्या स्तुत्य अशा उपक्रमाचे जुन्नर तालुका गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे,शिक्षण विस्तार अधिकारी अशोक गोडसे,नगदवाडी केंद्रप्रमुख वनिता हांडे,नगदवाडी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,सर्व सदस्य व ग्रामस्थ यांनी कौतुक केले.



तेलीवाडी ग्रामस्थांचा आमदार शेखर निकम यांना भक्कम पाठिंबा

■ चिपळुण (दै. संध्या)

लोकांच्या अडीअडचणी समजून घेणारे नेतृत्व, शांत व संयमी स्वभाव आणि विकासकामांबाबतची सकारात्मक कार्यपद्धती यांवर विश्वास व्यक्त करत देवरुख येथील तेलीवाडीच्या ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गटात) जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयात सावर्डे येथे हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी आमदार शेखर निकम यांनी सर्व ग्रामस्थांचे स्वागत करून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला.

■ (दै. संध्या)

दोन पिढ्यांचा सुसंवाद आणि विचारांची परिपक्वता- काळाची गरज

लेखक : विकास संजय निर्मळ
मुख्य कार्यकारी अधिकारी,
कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था,
काऱ्हाटी ता. बारामती

मानवी संस्कृतीचा प्रवास हा सततच्या परिवर्तनाचा आणि उत्क्रांतीचा प्रवास आहे.काळ बदलतो तशी जीवनशैली बदलते, भाषा बदलते आणि जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो. मात्र,या बदलत्या प्रवासात दोन पिढ्यांमधील - विशेषतः माय-बाप आणि आजची नवी पिढी यांच्यातील - संवाद अधिक गुंतागुंतीचा होताना दिसत आहे. आजच्या अत्यंत वेगवान आणि माहितीच्या युगात,या दोन पिढ्यांमधील दरी मिटवून सहजीवनाचा आनंद घेण्यासाठी सर्वात जास्त गरज कशाची असेल, तर ती म्हणजे 'विचारांच्या परिपक्वतेची'.

आजची नवी पिढी एका अशा विश्वात जगत आहे,जिथे तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि गगनाला भिडणाऱ्या आकांक्षा एकत्र नांदत आहेत.प्रत्येक गोष्टीमागे 'का?' असा तर्क शोधण्याची आणि स्वतःचे स्वातंत्र्य जपण्याची त्यांची सवय आहे. अशा वेळी,पालकांनी केवळ वयाचा किंवा अनुभवाचा अधिकार गाजवत जुने नियम लादणे आजच्या काळात कुचकामी ठरते. "आम्ही सांगू तसेच झाले पाहिजे" या अट्टाहासामुळे नात्यांमध्ये नकळत दुरावा निर्माण होतो.याउलट,पालकांनी स्वतःच्या विचारांमध्ये लवचिकता आणि प्रगल्भता आणणे गरजेचे आहे. आजची मुले परिपूर्णतेची अपेक्षा करत नाहीत,तर त्यांना 'आपल्याला समजून घेणारा' पालक हवा असतो.

दुसऱ्या बाजूला,तरुण पिढीच्या खांद्यावरही तितकीच मोठी जबाबदारी आहे.हातातील आधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग जरी मुठीत आले असले, तरी माय-बापाच्या कष्टांची आणि त्यांच्या जीवन-अनुभवाची जागा जगातील कोणतीही पुस्तके किंवा इंटरनेट घेऊ शकत नाही.आपल्या ज्ञानाचा किंवा आधुनिकतेचा अहंकार बाळगून पालकांच्या भावनांकडे दुर्लक्ष करणे ही विचारांची अपरिपक्वता ठरते. पालकांचे पुस्तकी शिक्षण कदाचित कमी असेल,पण आयुष्याच्या पटलावर त्यांनी पचवलेले ऊन-पाऊस कोणत्याही विद्यापीठापेक्षा मोठे असतात,याचे भान नव्या पिढीने ठेवले पाहिजे. नात्यांमधील हा गोडवा टिकवण्यासाठी दोन्ही बाजूंनी 'प्रतिक्रिया' (Reaction) देण्याऐवजी संयमाने 'प्रतिसाद' (Response) देण्याची कला शिकायला हवी. रागाच्या किंवा मतभेदाच्या क्षणी टोकाची भूमिका घेण्यापेक्षा,समोरासमोर बसून शांतपणे संवाद साधणे म्हणजेच खरी वैचारिक प्रगल्भता होय. मुलांना त्यांच्या विश्वात वावरण्याचे स्वातंत्र्य देणे आणि चुकांमधून सावरताना त्यांचा मजबूत पाठीराखा बनणे,हेच पालकांच्या परिपक्वतेचे खरे लक्षण आहे. अखेर, जुन्या संस्कृतीचे आणि अनुभवांचे संस्कार अन् नव्या युगाच्या विचारांची झेप जेव्हा हातात हात घालून चालतात, तेव्हा पिढ्यांमधील दरी आपोआप नाहीशी होते.विचारांची ही परिपक्वता केवळ कौटुंबिक कलह संपवत नाही,तर एका निरोगी, समंजस आणि प्रगल्भ समाजाची पायाभरणी करते. घरोघरी आणि मनात संवादाचा हा पूल भक्कम झाला,तरच एक सुसंस्कृत आणि समृद्ध समाज आकारास येईल.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



निवृत्त एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक यांचा सन्मान

पुणे : दैनिक संध्या

स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून देशासाठी सर्वत्याग करणारे पराक्रमी सेनाधिकारी आपल्या कायम स्मरणात रहावे आणि नागरिकांनी सैनिकांसोबत कृतज्ञतेने सर्व सण उत्सव साजरे करावे, या उद्देशाने सैनिक मित्र परिवार, पुणे च्या वतीने विजयादशमी निमित्त, पराक्रमी सेनाधिकारी निवृत्त एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक (AVSM, PVSM) यांचा सपत्नीक निवासी सन्मान करण्यात आला. बाणेर येथील पॅराडाईज को-ऑप हाऊसिंग सोसायटीतील नाईक यांच्या निवासस्थानी ह्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी कॉसमॉस बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे, कोड लॅब्जचे अध्यक्ष सचिन संघई, उद्योजक शिवाजी भागवत, श्री तुळशीबाग गणपती मंडळाचे नितीन पंडीत, सैनिक मित्र परिवाराचे आनंद सराफ आदी उपस्थित होते. किरण पाटोळे, राजाभाऊ महाडिक, शेखर कोरडे, योगिनी पाळंदे, कल्याणी सराफ,अमर लांडे आदींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. पुणेरी पगडी, महावस्त्र, श्री गणेशाची मूर्ती असलेली सन्मानचिन्ह, मिठाई असे सन्मानाचे स्वरूप होते. मिलिंद काळे म्हणाले, सैनिकांप्रमाणे वागण्याची आज समाजाला गरज आहे. मागील २० वर्षात जनमानसांत अनेक बदल झाले आहेत. यापूर्वी शिक्षकांनी शिस्त सांगावी आणि आदर्श निर्माण करावा, अशी परिस्थिती होती. मात्र, आता पुढील पिढीसाठी अनुकरणीय असे भारतीय सैनिक आणि सेनाधिकारी आदर्श आहेत. वार्षिक सण उत्सव सैनिकांसोबत साजरे करून आपण त्यांच्याप्रती कृतज्ञता आणि आदर भावना व्यक्त करायला हवी. आनंद सराफ म्हणाले, सन १९९६ पासून सैनिकांसाठी कार्य सुरु आहे. सामान्य नागरिक सैनिकांसोबत आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत, ही भावना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याकरिता विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. सीमारेषा आणि युद्धभूमीचा अभ्यास करताना सैनिक मित्र परिवारातील सदस्यांना भूमी आणि मातृभूमी यामधील अनुभूती आली, त्यामुळे सेनाधिकारी सन्मानासारखे अनेक उपक्रम आजही निरंतरपणे सुरु आहेत, असेही त्यांनी सांगितले. निवृत्त एअर चीफ मार्शल प्रदीप वसंत नाईक यांनी देखील युद्धातील निवडक प्रसंग उपस्थितांना सांगितले. यावेळी नाईक यांच्या घराच्या दारावर तोरण लावत, रंगावली देखील रेखाटण्यात आली. तसेच सनई चौघड्यांचे मंगल वादन देखील झाले.

सोन्या-चांदीच्या बाजारात ज्ञानाची पर्वणी; लक्ष्मी रोडवर २० हजार पुस्तकांचे भव्य प्रदर्शन



पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील प्रसिद्ध लक्ष्मी रोडवर भव्य 'वॉव बुक फेअर' पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार सायंकाळी ७ वाजता ज्येष्ठ समीक्षक, विचारवंत आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. या सोहळ्यास विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सोनी, विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे संपादक व इतिहास अभ्यासक संदीप तापकीर आणि 'वॉव पब्लिशिंग्ज प्रा. लि.'च्या संपादक प्रेमा भटेवरा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनात २० हजारांहून अधिक पुस्तकांचा समृद्ध संग्रह उपलब्ध असणार आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील बालसाहित्य, कथा-कादंबऱ्या, ऐतिहासिक साहित्य, चरित्रे, आत्मचरित्रे, अध्यात्म, व्यक्तिमत्त्व विकास आणि स्व-विकास अशा विविध विषयांवरील पुस्तके वाचकांना एकाच ठिकाणी पाहता आणि खरेदी करता येणार आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही उपयुक्त पुस्तके उपलब्ध असतील. सोने, कपडे आणि सणासुदीच्या खरेदीसाठी प्रसिद्ध असलेल्या लक्ष्मी रोडवर पुस्तक प्रदर्शनाच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीला चालना देण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. डिजिटल युगात मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, मोबाईलच्या पलीकडे पुस्तकांशी मैत्री वाढवणे आणि कुटुंबासह पुस्तक खरेदीचा आनंद अनुभवण्याची संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. २४ ऑक्टोबर ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी दहा ते रात्री आठ अशी आहे. 'लक्ष्मीच्या खरेदीसोबत, ज्ञानाचीही गुंतवणूक करा!' या संदेशासह पुणेकरांनी या पुस्तक प्रदर्शनाला भेट द्यावी, सदरील प्रदर्शन सर्वांसाठी मोफत खुले आहे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

सुवर्णवस्त्रांनी सजली सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी देवी



पुणे : दैनिक संध्या

आकर्षक कलाकुसर करून सजलेली १६ किलो सोन्याची साडी आणि सुमारे २ किलो सोन्यापासून तयार करण्यात आलेला रत्नजडित मुकुट दसऱ्यानिमित्त सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी देवीला परिधान करण्यात आला. सुवर्णवस्त्रांनी सजलेले हे महालक्ष्मी देवीचे रूप पाहण्यासोबतच दर्शनाकरिता पुणेकरांनी मोठे गर्दी केली. श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग तर्फे वर्षातून दोन वेळा म्हणजेच दसरा आणि लक्ष्मीपूजन या दिवशी देवीला ही साडी परिधान करण्यात येते. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा, राजेश सांकला, रमेश पटोदिया, राजकुमार चमडीया, निलेश लहड यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी यंदाच्या उत्सवाचे आयोजन केले आहे. प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल म्हणाल्या, पुरातन काळापासून दसऱ्याच्या दिवशी सोने लुटण्याची परंपरा आहे. त्या परंपरेनुसार सोन्याच्या साडीत श्री महालक्ष्मी देवीचे दर्शन भाविकांना व्हावे, याकरिता ही साडी देवीला नेसवली जाते. हैद्राबाद मध्ये साडीची कलाकुसर साकारण्यात आली असून सुमारे ६ महिने काम सुरु होते. आकर्षक नक्षीकाम करून ही साडी देवीसाठी साकारण्यात आली आहे. त्यामुळे सुवर्णवस्त्रातील हे रूप भाविकांना दसऱ्याच्या दिवशी दिवसभर पाहण्याची संधी मिळणार आहे. उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल म्हणाल्या, सुमारे २ किलो सोन्याच्या मुकुटावर करण्यात आलेले अतिशय सुबक आणि नाजूक नक्षीकाम हे विशेष लक्षवेधी आहे. पारंपरिक धार्मिक संकल्पना, उत्कृष्ट सुवर्णकारिता आणि कलात्मक सौंदर्य यांचा सुंदर संगम या मुकुटामध्ये पाहायला मिळतो. दसऱ्याच्या निमित्ताने भाविकांसाठी हा सुवर्ण मुकुट विशेष आकर्षण ठरत असून, श्री महालक्ष्मी देवीच्या दर्शनाला आणखी एक दिव्य आणि वैभवशाली स्वरूप प्राप्त झाले आहे.

डॉ. ईशानी बेंडाळे यांची आरोग्य संघटनेच्या मुख्यालयाला भेट

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शिष्टमंडळात सहभाग; जागतिक आरोग्य क्षेत्रातील आयुर्वेदाच्या संभाव्य योगदानाची मांडणी

■ पुणे (दै. संध्या)

आयुर्वेद अभ्यासक पुण्यातील डॉ. ईशानी बेंडाळे यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शिष्टमंडळाचा भाग म्हणून जिनिव्हा येथील जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) मुख्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांसोबत झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. प्रतिजैविकांना प्रतिकारक्षमता या विषयावरील चर्चेत त्यांनी आयुर्वेदाची भूमिका यावर भाष्य केले. आयुर्वेदाचा जागतिक आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये कसा उपयोग होऊ शकतो, याचा शास्त्रीय आणि काटेकोर संशोधनाच्या माध्यमातून अभ्यास करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. जागतिक आयुर्वेद दिनाच्या पार्श्वभूमीवर आयुर्वेदाच्या जागतिक आरोग्यातील संभाव्य योगदानाच्या दृष्टीने या चर्चेला विशेष महत्त्व प्राप्त होते. जिनिव्हा दौऱ्यादरम्यान डॉ. बेंडाळे यांनी संयुक्त राष्ट्रांच्या जिनिव्हा येथील कार्यालयालाही भेट दिली. यावेळी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शिष्टमंडळासाठी आयोजित ज्ञानाधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेत त्यांनी विजेतेपद मिळविले. डॉ. बेंडाळे या ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून तेथून एमएस्सी पदवी पूर्ण करणाऱ्या पहिल्या आयुर्वेद चिकित्सक आहेत. तसेच,



सध्या त्या ऑक्सफर्ड विद्यापीठात डीफिल (पीएचडी) पदवीचे संशोधन करणाऱ्या पहिल्या आयुर्वेद चिकित्सक ठरल्या आहेत.

त्यांनी स्वान्सी विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयातून नॅनोमेडिसिन या विषयात एमएस्सी पदवी प्राप्त केली असून, ब्रिटिश सोसायटी फॉर नॅनोमेडिसिनच्या 'चॅम्पियन' म्हणूनही त्यांची निवड झाली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महिलांच्या स्थितीविषयक आयोगाच्या सीएसडब्ल्यू६८, सीएसडब्ल्यू६९ आणि सीएसडब्ल्यू७० या सलग तीन अधिवेशनांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. जगातील अग्रगण्य वादविवाद मंडळांपैकी एक असलेल्या ऑक्सफर्ड युनियनमध्ये त्या सध्या 'डायरेक्टर ऑफ एंगेजमेंट' म्हणून कार्यरत आहेत. नामवंत वक्ते आणि सार्वजनिक जीवनातील प्रतिष्ठित व्यक्तींशी संवाद साधणे, मुलाखती व चर्चांमध्ये योगदान देणे आणि संस्थेतील विचारमंथन व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्या काम करतात. ऑक्सफर्ड युनियनमध्ये त्यांनी विकिपीडियाचे संस्थापक जिमी वेल्स यांची मुलाखत घेतली. यावेळी विकिपीडियावरील आयुर्वेदासंदर्भातील माहिती आणि त्यामध्ये वापरण्यात आलेल्या शब्दप्रयोगांबाबतही दोघांमध्ये चर्चा झाली. या विषयावर अधिक सविस्तर चर्चा करण्यासाठी विकिपीडियाच्या वैज्ञानिक विषयांशी संबंधित तज्ज्ञाशी संपर्क करून देण्याची तयारी वेल्स यांनी दर्शवली.

ऑक्सफर्ड मॉडेल युनायटेड नेशन्स इंडिया या उपक्रमात त्यांनी २०२४ आणि २०२५ मध्ये जागतिक आरोग्य संघटना समितीच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळली. २०२६ मध्ये त्यांनी महासंचालकपदासह संयुक्त राष्ट्रांच्या महिलांच्या स्थितीविषयक आयोगाच्या समितीच्या संचालकपदाची जबाबदारीही पार पाडली. आयुर्वेद, पुराव्यांवर आधारित आरोग्यसेवा, नॅनोमेडिसिन आणि जागतिक आरोग्य या क्षेत्रांतील कार्यासोबतच आंतरराष्ट्रीय घडामोडी, मुत्सद्देगिरी, विज्ञानविषयक संवाद आणि युवा नेतृत्व या क्षेत्रांतही डॉ. बेंडाळे योगदान देत आहेत.

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो धावेना; काँग्रेसची भाजपावर टीका

■ पुणे (दै. संध्या)

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोच्या उदघाटनासाठी पंतप्रधानांना वेळ मिळत नाही. त्यामुळे या मार्गावर मेट्रो धावत नाही, अशी टीका माजी आमदार आणि प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केली आहे. हिंजवडी आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडी होते. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो धावू लागल्यावर सध्या होत असलेली कोंडी थोडीतरी कमी होईल, अशी अपेक्षेत आयटी कर्मचारी आणि नागरिकांना आहे. आता हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे बहुतांश काम झाले आहे. या मेट्रोच्या १७ स्थानकांना मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांची परवानगी तीन महिन्यांपूर्वीच मिळालेली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हिंजवडी-



शिवाजीनगर मेट्रो मार्गावर प्रवाशांशिवायच मेट्रो धावते आहे. हा प्रकार पुणेकरांच्या सहनशक्तीचा अंत पहाणारा आणि कर रूपाने जमा होणाऱ्या पुणेकरांच्या पैशांचा अपव्यय करणारा आहे. भाजपने या मार्गावरची मेट्रो सेवाच अडवून धरली आहे. मेट्रो मार्ग बांधणाऱ्या पुणे महानगर प्रदेश विकास महानगर (पीएमआरडीए)चे प्रशासनही भाजपपुढे हतबल झाले आहे, अशी टीका जोशी यांनी केली आहे.

माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांना जीवनगौरव पुरस्कार

■ संस्थेचा १३ वा वर्धापन दिन; पद्मश्री राहीबाई पोपेरे, औदुंबर उकिरडे, मिलिंद शिंदे, निलेश ढमढेरे, जयंत हिरे पुरस्काराचे मानकरी

■ पुणे (दै. संध्या)

शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात अग्रगण्य संस्था म्हणून ओळख असलेल्या नऱ्हे मानाजीनगर येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट्स् च्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार माजी खासदार, समाजसेवक प्रा. जोगेंद्र कवाडे यांना शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल १, मानाजीनगर, न-हे येथे होणा-या



कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. सन्मान सोहळ्यांतर्गत पद्मश्री राहीबाई पोपेरे यांना कृषी क्षेत्रातील पुरस्कार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे अध्यक्ष औदुंबर उकिरडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार, सिने अभिनेता मिलिंद शिंदे यांना कला क्षेत्रातील पुरस्कार, पुणे अर्बन को-ऑप बँकेचे अध्यक्ष निलेश ढमढेरे यांना सहकार क्षेत्रातील पुरस्कार आणि समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्टचे जयंत हिरे यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल असे पुरस्कारांचे स्वरुप आहे.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, दरवर्षी शैक्षणिक, सामाजिक, सहकार, कला यांसह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तिंना पुरस्काराने गौरविण्यात येते. यावर्षी कार्यक्रमाला ज्येष्ठ संपादक विजय बाविस्कर हे अध्यक्षस्थानी असणार आहेत. तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

स्त्री-पुरुष समानतेचे सूत्र आजच्या पिढीने मानले

■ ज्येष्ठ लेखिका मृणालिनी चितळे ; ज्येष्ठ अभिनेत्री सुषमा देशपांडे यांना व्यावसायिक सर्वोत्तम गुणवत्ता पुरस्कार प्रदान

■ पुणे (दै. संध्या)

आजच्या पिढीतील पुरुष पालकत्वाची जबाबदारी स्वीकारत त्याचा आनंद घेत आहेत, हे चांगले चित्र आहे. पूर्वीच्या समाजसुधारकांनी पाहिलेले स्वप्न आज पूर्णत्वास जाताना दिसत आहे. आज आपण वेगळ्या दृष्टीने स्त्री - पुरुष समानतेकडे बघत आहोत. समानतेचे हे सूत्र आजच्या पिढीने मानले असल्याची भावना ज्येष्ठ लेखिका मृणालिनी चितळे यांनी व्यक्त केली. रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊन च्या वतीने व्यावसायिक सर्वोत्तम गुणवत्ता पुरस्कार प्रदान कार्यक्रम एरंडवणे येथील सेवासदन शाळेच्या सभागृहात



आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री सुषमा देशपांडे यांना व्यावसायिक सर्वोत्तम गुणवत्ता पुरस्काराने गौरविण्यात आले. व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्ष डॉ. शुभदा जठार, सचिव समीर मोहिरे, संचालक सुरज पाषाणकर आदी उपस्थित होते. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

मृणालिनी चितळे म्हणाल्या, एकपात्री प्रयोग करण्यामध्ये अनेक आव्हाने असतात. मात्र, सुषमा देशपांडे यांनी ती आव्हाने लिलया पेलली. सावित्रीबाईंची भूमिका करताना त्याप्रकारची देहबोली, बाझ यासाठी संशोधन व अभ्यास देखील केला. स्त्री म्हणून प्रत्येकीला कर्तृत्व सिद्ध करायला लागते. हे फक्त भारतात नाही, तर अमेरिकेसारख्या देशातही स्त्री समोर अनेक आव्हाने आहेत. कोठेही आत्मसन्मान मागून मिळत नाही. तर तो कमवावा लागतो, असेही त्यांनी सांगितले.

मी मॅनेज होणाऱ्यांपैकी नाही; शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणारच : तृप्ती देसाई

■ पुणे (दै. संध्या)

मावळ तालुक्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून सामाजिक कार्यकर्त्या आणि भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका तृप्ती देसाई यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. आपल्यावर खोटे आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न झाला, तरी आपण घाबरणार नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठीचा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. यासंदर्भात आपली भूमिका मांडताना तृप्ती देसाई म्हणाल्या, "मावळ तालुक्यात इतरांना पैसे वाटून आणि माझ्यावर काहीही खोटे आरोप करून मला बदनाम केल्यानंतर मी घाबरेन, असे जर कोणाला वाटत असेल, तर त्यांनी तृप्ती देसाईंना ओळखलेलेच नाही. मी काय तुम्हाला मॅनेज होणाऱ्यांपैकी नाही. मी शेतकऱ्यांना न्याय



मिळवून देणारच!" आपल्याला कोणत्याही दबावाला बळी पाडता येणार नाही, असा ठाम संदेश देत देसाई यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून माघार घेणार नसल्याचे संकेत दिले. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवणे आणि त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, ही आपली भूमिका असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. दरम्यान, "सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं" या शब्दांत त्यांनी आपला लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

ग्लेनफिडिक आणि राजेश प्रताप सिंग यांचा अनोखा सहयोग

लक्झरी भेटवस्तूंच्या संकल्पनेला नवे रूप



■ पुणे (दै. संध्या)

ग्लेनफिडिक या अग्रगण्य सिंगल माल्ट स्कॉच व्हिस्की ब्रँडने भारतातील आपल्या १२, १५ आणि १८-इयर-ओल्ड प्रकारांमध्ये लिमिटेड-एडिशन फेस्टिव्ह गिफ्टिंग कलेक्शन सादर करण्यासाठी प्रख्यात भारतीय डिझायनर राजेश प्रताप सिंग यांच्यासोबत सहयोग केला आहे. कारागिरी, अचूकता आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाच्या सामायिक ध्यासाने प्रेरित हा सहयोग विचारपूर्वक डिझाइन केलेल्या ॲक्सेसरीजच्या माध्यमातून लक्झरी व्हिस्की गिफ्टिंगची संकल्पना नव्याने मांडतो, ज्यामुळे ग्लेनफिडिकचा हा अनुभव अधिक विस्तारतो.

अनेक पिढ्यांपासून, ग्लेनफिडिकने आपल्या समृद्ध वारशाशी एकनिष्ठ राहताना रूढ चौकटींना आव्हान दिले आहे आणि सिंगल माल्ट व्हिस्की बनवण्याच्या कलेचा सातत्याने विस्तार केला आहे. हाच नाविन्यपूर्ण दृष्टिकोन सिंग यांच्यासोबत सहयोगाचा मुख्य आधार आहे, ज्यांचे समकालीन डिझाइनचे तत्त्वज्ञान परंपरा, अचूकता आणि पुरोगामी दृष्टिकोनाला अशाच प्रकारे एकत्र आणते. हे दोघे मिळून दोन वेगळ्या सर्जनशील विश्वांना एकत्र आणतात, जे उत्कृष्टतेप्रती असलेली कटिबद्धता आणि सर्वोत्तम कारागिरी अधोरेखित करणाऱ्या बारकाव्यांच्या जाणिवेतून एकत्र आले आहेत.

गिफ्टिंगच्या पारंपरिक पद्धतींच्या पलीकडे जाऊन हे कलेक्शन या फेस्टिव्ह प्रसंगामध्ये वैयक्तिक ओळख आणि समकालीन डिझाइनची भर करते. ग्लेनफिडिक १२-इयर-ओल्ड गिफ्टिंग पॅकमध्ये एका खास डिझाइन केलेल्या पॉकेट स्क्वेअरचा समावेश आहे, बाटलीच्या मानेवर लावलेल्या वैशिष्ट्यपूर्ण टॅगच्या माध्यमातून १० डिझाइन्स प्रदर्शित केल्या आहेत. ग्लेनफिडिक १५ इयर ओल्ड एडिशनमध्ये पॉकेट स्क्वेअरसह स्टॅग (हरिण) ब्रोचची जोड देण्यात आली आहे, तर १८ इयर ओल्ड एडिशनमध्ये विशेष डिझाइन केलेल्या बटन्सच्या सेटचा समावेश आहे. यातील प्रत्येक ॲक्सेसरी ग्लेनफिडिकच्या कारागिरीचे वैयक्तिक शैलीत रूपांतर करते, तर त्याचे पॅकेजिंग ब्रँडचे प्रसिद्ध स्टॅग आणि डिस्टिलरीचे चित्रण सुवर्ण फेस्टिव्ह नक्षीकामासह एकत्र आणते. विल्यम ग्रँट अँड सन्स इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर कार्तिक मोहिंद्रा म्हणाले, "ग्लेनफिडिकमध्ये आमचा नाविन्यपूर्ण दृष्टिकोन नेहमी कारागिरीबद्दल सखोल आदर आणि नाविन्यपूर्णतेच्या प्रेरणेमध्ये रुजलेला आहे. राजेश प्रताप सिंग यांच्यासोबत आमचा सहयोग लक्झरी गिफ्टिंगच्या नवीन अभिव्यक्तीच्या माध्यमातून या तत्त्वज्ञानाला प्रत्यक्षात आणतो. काहीतरी वैशिष्ट्यपूर्ण, विचारपूर्वक आणि चिरस्थायी निर्माण करण्यासाठी गिफ्टिंगच्या पारंपरिक पद्धतींच्या पलीकडे जाऊन आम्ही ग्लेनफिडिक हा अनुभव केवळ व्हिस्कीपुरता मर्यादित न ठेवता अधिक व्यापक करत आहोत. यामधून आमचा विश्वास दिसून येतो की, खरे लक्झरी केवळ तुम्ही काय देता यात नसून त्यामागील विचार, कलाकुसर आणि अर्थ यात असते."

राजेश प्रताप सिंग म्हणाले, "ग्लेनफिडिकबद्दल मला सर्वात जास्त आकर्षित करणारी गोष्ट म्हणजे पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या वारशाचा आदर राखत आपल्या कलेच्या कक्षा सातत्याने विस्तारण्याची त्यांची क्षमता. हा नाविन्यपूर्ण दृष्टिकोन माझ्या स्वतःच्या डिझाइनच्या विचारसरणीशी अगदी तंतोतंत जुळणारा आहे. हा प्रवास अचूकता आणि उत्कृष्टतेच्या आमच्या सामायिक ध्यासाला मूर्त रूपात आणण्याबद्दल होता, ज्यामध्ये एखाद्या वस्तूला स्वतंत्र रूप देणारे साहित्य, रचना आणि बारकाव्यांवर बारकाईने लक्ष केंद्रित करण्यात आले. या प्रयत्नांतून सामायिक तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून दोन भिन्न विश्वे एकत्र आली आहेत, तसेच या फेस्टिव्ह प्रसंगाच्या पलीकडेही या सहयोगाची भावना जपणारी उत्पादने साकारली गेली आहेत."

तीन प्रकारांमध्ये विस्तारलेले हे कलेक्शन वैयक्तिक शैलीचा विस्तार आणि कलेची कदर म्हणून गिफ्टिंगचा उत्सव साजरा करते, ज्यामध्ये फेस्टिव्ह क्षणांच्या पलीकडेही आनंद घेता येईल अशा वस्तूंची निर्मिती करण्यात आली आहे.

गुरगाव : ग्लेनफिडिक १२-इयर-ओल्ड - ३,२०० रुपये, ग्लेनफिडिक १५-इयर-ओल्ड - ५,८०० रुपये, ग्लेनफिडिक १८-इयर-ओल्ड - ९,००० रुपये

मुंबई : ग्लेनफिडिक १२-इयर-ओल्ड - ६,००० रुपये, ग्लेनफिडिक १५-इयर-ओल्ड - ११,००० रुपये, ग्लेनफिडिक १८-इयर-ओल्ड - १७,००० रुपये

बेंगळुरू : ग्लेनफिडिक १२-इयर-ओल्ड - ४,८०० रुपये, ग्लेनफिडिक १५-इयर-ओल्ड - ७,२७१ रुपये, ग्लेनफिडिक १८-इयर-ओल्ड - ११,१३० रुपये

थोडक्यात पण महत्वाचे




चौफुल्यात नॅशनल लॉजवर पोलिसांची तपासणी; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण!

दौंड : दैनिक संध्या

दौंड तालुक्यातील चौफुला येथील नॅशनल लॉजवर पोलिसांकडून तपासणी करण्यात येत असतानाच, दुसरीकडे मुख्य चौकात वाहतुकीचा मोठा खोळंबा झाल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला. शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) दुपारपासून चौफुला चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अशा परिस्थितीत वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस किंवा वाहतूक विभागाचे कर्मचारी उपस्थित नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. त्यामुळे लॉजवरील पोलीस तपासणी आणि दुसरीकडे विस्कळीत झालेली वाहतूक व्यवस्था यावरून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. चौफुला हा दौंड तालुक्यातील महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू असून, या ठिकाणी दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. शनिवारी दुपारच्या सुमारास मुख्य चौकात वाहतुकीची कोंडी झाल्याने वाहनचालकांना बराच वेळ अडकून पडावे लागले. वाहनांच्या रांगा लागल्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली. मात्र, वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित यंत्रणा घटनास्थळी दिसत नसल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, चौफुला येथील नॅशनल लॉजवर यवत पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात येत असल्याची चर्चा होती. याबाबत यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांच्याशी संपर्क साधला असता, "तपासणी करण्यासाठी आमचे अधिकारी गेले आहेत," अशी माहिती त्यांनी दिली. पोलिसांकडून लॉजची तपासणी सुरू असल्याची माहिती समोर आली असताना, त्याच परिसरातील मुख्य चौकात वाहतूक कोंडी झाल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कामकाजाबाबत प्रश्न उपस्थित केले. लॉज आणि हॉटेलमधील तपासणी करणे ही पोलिसांची जबाबदारी असली, तरी सार्वजनिक रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत ठेवणे आणि नागरिकांची गैरसोय टाळणे याकडेही तितकेच लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. चौफुला चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न वारंवार ऐरणीवर येत असताना, गर्दीच्या वेळेत वाहतूक पोलिसांची नियुक्ती करणे, वाहनांचे योग्य नियोजन करणे आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे. लॉजवरील तपासणीसाठी अधिकारी उपलब्ध होतात, तर वाहतूक कोंडीत अडकलेल्या सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी कर्मचारी का दिसत नाहीत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

स्व. जीवनशेठ सोनवणे यांचा मंगळवारी प्रथम स्मृतिदिन



चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते व माजी नगरसेवक स्व. जीवनशेठ आनंदराव सोनवणे यांचा चाकण येथे मंगळवारी (दि.२७) प्रथम स्मृतिदिन आहे. त्यानिमित्त किर्तनरुपी सेवा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. जीवनशेठ सोनवणे हे चाकण शहराचे भूषण होते. त्यांच्या निधनाला मंगळवारी एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यांच्या आठवणींना उजाळा मिळावा, त्यांच्या आठवणी चिरंतन काळ टिकून राहाव्यात, त्यांची व्यासंगी परंपरा व स्मृति जतन राहाव्यात, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून सोनवणे कुटुंबीयांच्या वतीने मंगळवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक करणशेठ सोनवणे यांनी दिली. येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात मंगळवारी सकाळी दहा वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाज प्रबोधनकार हभप. गणेश महाराज वाघमारे यांची कीर्तन रुपी सेवा संपन्न होणार आहे. प्रारंभी, खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते व जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुरेखा मोहिते यांच्या हस्ते स्व. जीवनशेठ सोनवणे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. यावेळी चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक साहेबराव कड, प्रकाश भुजबळ, आकाश जाधव, सागर बनकर, धीरज मुटके, एड. वर्षा शेवकरी, रेश्मा मुटके, तृप्ती जगनाडे, विजया तोडकर व विजया जाधव आदी उपस्थित राहुन आदरांजली वाहणार आहेत. जीवन शेठ सोनवणे यांनी त्यांच्या हयातीत केलेल्या कष्टाचे चीज व्हावे, इतरांनी त्यांचा आदर्श घ्यावा या भावनेतून चाकण येथे मंगळवारी या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे करणशेठ सोनवणे यांनी सांगितले.

काँग्रेसच्या विभाग व सेलसाठी प्रदेश समन्वय समिती स्थापन

मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत असलेल्या सर्व विभाग व सेलचे प्रदेश काँग्रेस कमिटी सोबत समन्वय राहण्यासाठी तसेच या विभाग व सेल मार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम अधिक प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आणि विभाग व सेलच्या नियुक्त्यांमध्ये सुत्रबध्दता ठेवण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून विभाग व सेल प्रदेश समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे प्रमुख शाहआलम शेख तर डॉ. धनंजय क्षिरसागर आणि जावेद फारुकी यांची सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी अध्यक्षपदी पंकज गुड्डेवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व नियुक्त्यांबद्दल प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांनी न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष स्वरूप समजून घ्यावे

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे मत; सूर्यदत्त लॉ कॉलेजमध्ये न्यायमूर्ती संजय देशमुख यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



"कायदा हा केवळ न्यायालयीन कामकाजापुरता किंवा कायद्याच्या पुस्तकांपुरता मर्यादित नसून, तो आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मालमत्तेचे व्यवहार, ग्राहकांचे हक्क, वाहतुकीचे नियम, कौटुंबिक संबंध आणि मूलभूत अधिकार अशा अनेक बाबींमध्ये कायद्याचे महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला कायद्याचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) खंडपीठाचे न्यायमूर्ती संजय देशमुख यांनी केले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या सूर्यदत्त लॉ कॉलेजमध्ये 'दैनंदिन जीवनातील कायद्याचे महत्त्व' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात संजय देशमुख बोलत होते. यावेळी पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. पांडुरंग थोरवे, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक तायवाडे आदी उपस्थित होते. यावेळी संजय देशमुख यांना 'सूर्यभारत सूर्यभूषण राष्ट्रीय पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. न्यायमूर्ती देशमुख यांनी विद्यार्थ्यांना कायद्याशी संबंधित प्रश्न विचारून त्यांच्या आकलनाची आणि तर्कशक्तीची पडताळणी केली. प्रथम वर्षातील बीबीए एलएलबीची विद्यार्थिनी मानसी भुबड हिने अचूक उत्तरे दिल्याबद्दल तिचा गौरव करण्यात आला. न्यायमूर्ती संजय देशमुख म्हणाले, "कायद्याचे ज्ञान नागरिकांना आपल्या अधिकारांचे संरक्षण करण्यास आणि कर्तव्यांची जाणीव ठेवण्यास मदत करते. कायद्याचा आदर, नियमांचे पालन आणि वादांचे सामंजस्याने निराकरण यांमुळे समाजात न्याय, समानता आणि सुव्यवस्था टिकून राहते. कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी चिकित्सक विचार, तर्कशुद्ध विश्लेषण, व्यावसायिक नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी. कायद्याचे ज्ञान सर्वसामान्य नागरिकांच्या उपयोगी पडणे आणि सर्वांना न्याय मिळवून देण्यासाठी त्याचा प्रभावी वापर होणे महत्त्वाचे आहे." दैनंदिन व्यवहारांमध्ये कायदेशीर बाबींचे ज्ञान असल्यास योग्य निर्णय घेणे, संभाव्य अडचणी टाळणे आणि अन्याय झाल्यास योग्य मार्गाने दाद मागणे शक्य होते. समाजात सुव्यवस्था राखण्यासाठी, वादांचे सामोपचाराने निराकरण करण्यासाठी तसेच न्याय, समानता आणि निष्पक्षतेची मूल्ये जपण्यासाठी कायद्याचे राज्य महत्त्वाचे आहे. कायद्याचे ज्ञान सामान्य नागरिकांच्या हितासाठी वापरणे आणि समाजातील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हे भावी कायदेतज्ज्ञांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "न्यायव्यवस्थेतील मान्यवरांशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणल्याने त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाला व्यावहारिक अनुभवाची जोड मिळते. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना न्यायदान प्रक्रियेचे स्वरूप समजते आणि कायदे क्षेत्रातील जबाबदाऱ्यांची जाणीव होते. न्यायमूर्तींसारख्या अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष स्वरूप समजण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी अशा संधींचा लाभ घेऊन आपले ज्ञान, व्यावसायिक दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी विकसित करावी."

या कार्यक्रमाला बीबीए एलएलबी, बीए एलएलबी, एलएलएम आणि पदविका अभ्यासक्रमांचे ४०० हून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील मूट कोर्ट सभागृह, प्रशस्त दालने आणि आधुनिक शैक्षणिक सुविधांचे न्यायमूर्ती देशमुख यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि प्राध्यापकांची शैक्षणिक क्षेत्रातील बांधिलकी यांचीही त्यांनी प्रशंसा केली. डॉ. दीपक तायवाडे यांनी प्रास्ताविक केले. सारा जाधव, अन्वेषा गायकवाड आणि कृष्णा दायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. सानिका हिने आभार मानले.

दिवाळीच्या खरेदीमुळे मध्यवस्तीत वाहतूक कोंडी!

■ पुणे (दै. संध्या)

दिवाळीच्या खरेदीसाठी शहराच्या मध्यवर्ती भागात नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता यांसह प्रमुख मार्गांवर शनिवारी दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. वाहनांची संख्या वाढल्याने रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागल्या. त्यातच नो-एंट्रीतून होणारी वाहतूक, दुहेरी पार्किंग तसेच नो-पार्किंगमध्ये उभी केलेली वाहने यामुळे कोंडीत आणखी भर पडत असल्याचे चित्र दिसून आले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढली आहे. कपडे, दागिने, सजावटीचे साहित्य, फराळाचे पदार्थ यासह विविध वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिक मोठ्या संख्येने मध्यवस्तीतील बाजारपेठांकडे येत आहेत. त्यामुळे नेहमीच्या तुलनेत या भागातील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. फडके हौद ते लाल महाल चौक, क्वार्टर गेट चौक ते टिळक चौक या संपूर्ण लक्ष्मी रस्त्यावर अनेक ठिकाणी वाहतुकीचा वेग मंदावला होता. कुमठेकर रस्ता आणि केळकर रस्त्यावरही वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्याचबरोबर फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्ता आणि टिळक रस्त्यावरही वाहतूक संथ झाली होती. मध्यवर्ती भागातील अनेक रस्त्यांवर दुहेरी पार्किंगमुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होत आहे. नो-पार्किंगच्या ठिकाणीही वाहने उभी केली जात असल्याने इतर वाहनांना मार्ग काढताना अडचणी येत आहेत. काही ठिकाणी नो-एंट्री असतानाही वाहने प्रवेश करत असल्याने वाहतुकीचा खोळंबा होत आहे. त्यामुळे एका ठिकाणी निर्माण झालेल्या कोंडीचा परिणाम लगतच्या रस्त्यांवरही होत असल्याचे दिसून आले. दुकानांसमोर ग्राहकांची गर्दी आणि रस्त्याच्या कडेला होणारे अनधिकृत पार्किंग यामुळे वाहतूक व्यवस्थेवर अतिरिक्त ताण पडत आहे.

ओआरएन व्हेंचर्सची १०० शहरांमध्ये विस्तार करण्याची योजना जाहीर

नव्या पिढीतील प्रवास उद्योजकांना सक्षम करण्याचा संकल्प

■ पुणे (दै. संध्या)



तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जागतिक पर्यटन सेवा उपलब्ध करून देणाऱ्या ओआरएन व्हेंचर्स या कंपनीने भारतातील 100 शहरांमध्ये आपले फ्रँचायझी नेटवर्क विस्तारण्याची योजना जाहीर केली आहे. या विस्ताराच्या माध्यमातून प्रवास क्षेत्रातील उद्योजकांसाठी नव्या संधी निर्माण करणे, तसेच देशभरातील ग्राहकांसाठी आंतरराष्ट्रीय पर्यटन अधिक सुलभ आणि सहज उपलब्ध करून देणे, हे कंपनीचे उद्दिष्ट आहे. स्थानिक उद्योजकतेची ताकद, आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्षम सेवा, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विविध प्रकारच्या पर्यटन अनुभवांचा सर्वसमावेशक पोर्टफोलिओ यांचा समन्वय साधणारे जागतिक स्तरावर जोडलेले पर्यटन व्यासपीठ उभारण्याच्या ओआरएन च्या दृष्टिकोनाचा हा विस्तार एक महत्त्वाचा भाग आहे.

भारतीय ग्राहकांसाठी आंतरराष्ट्रीय प्रवास अधिकाधिक सुलभ होत असताना, पारंपरिक पर्यटन पॅकेजेसपुरती मर्यादित न राहता वैयक्तिक आवडीनिवडींनुसार तयार केलेल्या, सोयीस्कर आणि अनोखे अनुभव देणाऱ्या सहलींकडे ग्राहकांचा कल वाढत आहे. ओआरएन आपल्या जागतिक पर्यटन परिसंस्थेच्या पाठबळावर स्थानिक पर्यटन व्यवसायांना विविध प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सहलींची व्यापक श्रेणी ग्राहकांना उपलब्ध करून देण्यास सक्षम बनवून या संधीचा लाभ घेण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे.

ओआरएन च्या व्यवसाय मॉडेलचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आंतरराष्ट्रीय पर्यटनाशी संबंधित विविध सेवांचे एकत्रीकरण. यामध्ये प्रवासाची वाहतूक साधने, निवास व्यवस्था, पर्यटनस्थळांवरील सेवा, विविध अनुभवाधारित उपक्रम आणि ग्राहक सहाय्य यांचा समावेश आहे. या सर्व सुविधा एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देत, सुट्ट्यांचे नियोजन आणि त्यांची अंमलबजावणी अधिक सुलभ करणे, तसेच ग्राहकांना अधिक सोयीस्कर, विश्वासार्ह आणि किफायतशीर पर्यटन अनुभव प्रदान करणे, हे ओआरएन चे उद्दिष्ट आहे.

कंपनीच्या पर्यटन सेवांच्या पोर्टफोलिओमध्ये ग्रुप हॉलिडेज, ग्राहकांच्या आवडीनिवडीनुसार तयार केलेले प्रवासाचे नियोजन, कॉर्पोरेट प्रवास आणि खासगी स्वरूपातील आंतरराष्ट्रीय सहलींसाठीची प्रायव्हेट बाय ओआरएन ही विशेष सेवा यांचा समावेश आहे. प्रायव्हेट बाय ओआरएन या सेवेद्वारे पर्यटकांना स्वतःच्या खासगी, चालकासह उपलब्ध करून दिलेल्या वाहनातून विविध पर्यटनस्थळांना भेट देता येते. निवास व्यवस्था, प्रेक्षणीय स्थळांची सफर, प्रवासाचे नियोजन आणि पर्यटनस्थळांवरील समन्वय यांसह संपूर्ण सहलीचा अनुभव अधिक सुकर करण्याची जबाबदारी ओआरएन सांभाळते.

सूर्यदत्तमध्ये 'नवरंग गरबा'चा जल्लोष; नृत्याच्या तालावर थिरकला बावधन कॅम्पस!

■ पुणे (दै. संध्या)



पारंपरिक संस्कृतीचा साज, गरब्याचा ताल, दांडियाचा निनाद आणि नवरंगांची मनमोहक उधळण अशा उत्साही वातावरणात सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या बावधन कॅम्पसमध्ये 'सूर्यदत्त नवरंग गरबा' हा सांस्कृतिक सोहळा रंगला. सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या विविध विभागांतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कॅम्पस नृत्य, संगीत आणि आनंदाने दुमदुमून गेला.

रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, गरबा-दांडियाच्या तालावर थिरकणारी पावले आणि समूहातील उत्कृष्ट समन्वय यांमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. भारतीय संस्कृती आणि परंपरांचा उत्सव साजरा करत विद्यार्थ्यांना आपली कला, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक अभिरुची व्यक्त करण्यासाठी या उपक्रमातून व्यासपीठ मिळाले. 'सूर्यदत्त नवरंग गरबा'मध्ये विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गातील कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी नऊ पुरस्कार श्रेणींचा समावेश करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट वेशभूषा – पुरुष, उत्कृष्ट वेशभूषा – महिला, उत्कृष्ट नर्तक – पुरुष, उत्कृष्ट नर्तक – महिला आणि उत्कृष्ट समूह असे पाच पुरस्कार ठेवण्यात आले. तसेच कर्मचारी वर्गासाठी उत्कृष्ट नृत्य – पुरुष कर्मचारी, उत्कृष्ट वेशभूषा – पुरुष कर्मचारी, उत्कृष्ट नृत्य – महिला कर्मचारी आणि उत्कृष्ट वेशभूषा – महिला कर्मचारी अशा चार विशेष श्रेणी निश्चित करण्यात आल्या.

संस्कृतीसोबत व्यक्तिमत्त्व विकासाला चालना

गरबा आणि दांडिया हे भारतीय सांस्कृतिक परंपरेचे महत्त्वपूर्ण भाग असून सामूहिक आनंद, सहकार्य आणि एकात्मतेचा संदेश देतात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संघभावना आणि परस्पर सहकार्य विकसित होण्यास मदत होते. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधणे यासाठी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन विविध सांस्कृतिक व सहशैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन देते.

या पुरस्कारांच्या माध्यमातून वैयक्तिक नृत्यकौशल्य, आकर्षक वेशभूषा, समूहातील समन्वय आणि उत्स्फूर्त सादरीकरण यांचा गौरव करण्याबरोबरच विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना आपली सांस्कृतिक प्रतिभा सादर करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपाध्यक्षा सौ. सुषमा चोरडिया यांच्या प्रोत्साहनातून अशा उपक्रमांना विशेष महत्त्व दिले जाते. विद्यार्थी आणि कर्मचारी यांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा उत्सव संस्थेतील स्नेह, सहकार्य आणि आपुलकीचे दर्शन घडवणारा ठरला.

या प्रसंगी संस्थेच्या सहउपाध्यक्षा सौ. स्नेहल नवलाखा म्हणाल्या, "'सूर्यदत्त नवरंग गरबा' म्हणजे परंपरेचा सन्मान आणि नव्या पिढीच्या ऊर्जेचा उत्सव! अशा उपक्रमांमुळे सूर्यदत्त परिवारातील एकतेची भावना अधिक दृढ होते."

संविधान प्रस्ताविका पाडल्याप्रकरणी काँग्रेसच्या बेमुदत आंदोलनाचा तिसरा दिवस

आंदोलन स्थळी माथेफिरूंचा वावर

■ चिंचवड/सांगवी (दै. संध्या)



सांगवी येथील संविधान चौकातील भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या शिल्पाची कथित मोडतोड करून ते हटविण्यात आल्याच्या निषेधार्थ सुरू असलेल्या बेमुदत धरणा आंदोलनाचा शनिवारी(दि.२४) तिसरा दिवस असून संविधानाच्या प्रास्ताविकेचे शिल्प पूर्ववत स्थापित करावे, या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी आणि संबंधित लोकप्रतिनिधीं तसेच आंदोलन स्थळी माथेफिरूंचा वावर वाढला असून त्यांच्यावरही गुन्हे दाखल करावेत, अशा प्रमुख मागण्या काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी केल्या आहेत. या आंदोलनाला विविध कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळत असून, आगामी काळात अधिक संघटना सहभागी होतील.

यावेळी नरेंद्र बनसोडे म्हणाले की, संविधान चौकातील भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या शिल्पाची मोडतोड करून ते हटविण्यात आले आहे. नवीन शिल्प उभारण्याचे कारण सांगितले जात असले, तरी या कामासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता, नवीन शिल्पाची मंजुरी, कार्यारंभ आदेश किंवा जुने बांधकाम हटविण्याचे आदेश महानगरपालिकेकडून देण्यात आले नाहीत.या प्रकरणात महानगरपालिकेच्या संबंधित प्रभाग कार्यालयाने पोलीस आयुक्तांना पत्र देऊन काम विनापरवाना व बेकायदेशीर असल्याचे कळविले आहे. आंदोलन स्थळी माथेफिरू तथा समाजकंटक पाठवून आंदोलनाला वेगळी दिशा देण्याचे काम विरोधक करत आहेत.

संबंधितांवर गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळत असली, तरी आंदोलनाच्या तिसऱ्या दिवसापर्यंत एफआयआरची प्रत मिळाली नसून त्यामुळे नेमकी कोणती कलमे लावण्यात आली आहेत, याची अधिकृत माहिती मिळालेली नाही. या प्रकरणात सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, राष्ट्रीय सन्मानाच्या प्रतीकांचा अवमान आणि समाजात तेढ निर्माण करण्यासंदर्भातील तरतुदींनुसार कारवाई करावी. तसेच संबंधित नगरसेविका तृप्ती कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करावा आणि संविधानाच्या प्रास्ताविकेचे शिल्प पूर्ववत स्थापित करावे.मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार बनसोडे यांनी व्यक्त केला.

युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अनिकेत सोनवणे म्हणाले की,संविधानामुळेच लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांना आणि महिलांना उच्च पदांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे संविधान हे केवळ कागदावरील लिखाण नसून, प्रत्येक नागरिकाचा स्वाभिमान आणि सन्मान आहे. संबंधित नगरसेविका तृप्ती संतोष कांबळे यांनी या घटनेबाबत सार्वजनिकरीत्या खुलासा करावा, माफी मागावी आणि नैतिक जबाबदारी स्वीकारून नगरसेवक पदाचा राजीनामा द्यावा. संविधानाच्या प्रास्ताविकेचे शिल्प हटविण्यापूर्वी नियमानुसार प्रक्रिया पार पाडली गेली होती का, याची चौकशी व्हावी.या प्रकरणात संबंधितांवर योग्य त्या कायदेशीर तरतुदींनुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि शिल्पाची पुनर्स्थापना करावी.या आंदोलनाला युवक काँग्रेसचा पाठिंबा असल्याचे सोनवणे यांनी स्पष्ट केले.

आंदोलन स्थळी काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे विभागीय उपक्रम निरीक्षक तौफिक हंडी,शहरातील पुरोगामी चळवळीचे नेते मानव कांबळे, अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय समन्वयिका समिता गोरे, काँग्रेस नेते राहुल वंजारी, अनुसूचित जाती विभागाचे शहराध्यक्ष रवी नांगरे, अल्पसंख्यांक विभागाचे शहराध्यक्ष शाबुद्दीन शेख,प्रदेश युवा काँग्रेसचे सचिव अनिकेत सोनवणे, स्वराज इंडिया अभियानचे प्रदीप पवार, आम आदमी पार्टीचे जितू बावनकर, संविधान जागर अभियानाचे श्रीकृष्ण कुलकर्णी शुभम हल्ले, स्नेहल शुभांगी, ऋषी कापडी, ज्येष्ठ गायक अशोक गायकवाड, शहर काँग्रेसचे पदाधिकारी, बीबी शिंदे, हरीश डोळस, डेनिस देवन सन, रिजवान खान, अमरपालसिंग पोथिवाल, रामकिसन माने, सुरज माने, बाबा गायसमुद्रे, शुभम थोरात, सदाशिव तळेकर, हिराचंद जाधव, आदिनाथ जावीर आदी उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



कॅम्पच्या हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजमध्ये ब्रेड दिन

पिंपरी : दैनिक संध्या

कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे चिंचवड येथील डॉ.अरविंद ब.तेलंग इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट येथे "जागतिक ब्रेड दिन" १६ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला फ्रँज & फिलो बेकर्सचे संस्थापक प्रख्यात बेकरी शेफ फिलिप बऊर, महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अजयकुमार राय, समन्वयक पाककला तज्ञ जेकब साळवे हे उपस्थित होते. बीएससीएचएस च्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील बेकरी शेफ जेकब साळवे यांच्या मदतीने वेगवेगळ्या देशातील विविध प्रकारचे ब्रेड बनविले होते. त्यामध्ये भारत, अमेरिका, अर्मेनिया, मिडल ईस्ट, इजिप्त, इझ्राएल इटली, फ्रान्स अशा देशांचा समावेश करण्यात आला होता. विविध देशातील पावाचे प्रकार जसे कि लादी पाव (भारत) गार्लिक ब्रेड (अमेरिका),लवाश (अर्मेनिया) , फतेयर (मिडल ईस्ट), सोअर ब्रेड (इजिप्त), शलाह (इझ्राएल), फोकासिया (इटली), ब्रिओचे (फ्रान्स), बगेट (फ्रान्स), असंसोर्टेड बटर बोर्ड इ. प्रकार तयार करून त्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. येवेळी शेफ फिलिप यांनी भविष्यातील प्रगतीसाठी ब्रेडचे महत्त्व आणि बेकर म्हणून काम करण्याच्या भविष्यातील संधी आणि हॉस्पिटॅलिटी (आतिथ्य) उद्योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



जिल्हा रुग्णालयाने २१७८४ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून राज्यात अव्वल

पिंपरी : दैनिक संध्या

सेवा संकल्प अभियानातर्गत दिनांक १७सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोंबर २०२६ या कालावधीत सर्व जिल्ह्यांमध्ये "मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम राबविण्यात आली. या अभियानात जिल्हा रुग्णालयातील नेत्र विभागाने पुणे जिल्ह्यात तब्बल २१७८४ शस्त्रक्रिया केल्या.संपूर्ण राज्यात पुणे जिह्यात सर्वाधिक शस्त्रक्रिया करून राज्यात अव्वल स्थान कायम ठेवले आहे. सेवा संकल्प अभियान पुणे जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नेत्रशल्य चिकित्सक डॉ. अंजली कुलकर्णी यांच्या मार्फत राबविण्यात आले. यात एकूण २१७८४ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तर १६५५ शासकीय मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मोफत तपासणी, मोफत शस्त्रक्रिया आणि व्यापक जनजागृतीद्वारे हे अभियान समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोचवण्यात आले. डॉ अंजली कुलकर्णी म्हणाल्या की, सेवा संकल्प अभियानात पुणे जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, पिंपरी चिंचवड रुग्णालय, अशासकीय संस्था व स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग होता. सर्व डॉक्टर, परिचारिका वैद्यकीय कर्मचारी यांच्या अथक परिश्रमामुळे शस्त्रक्रिया करणे शक्य झाले .

साहित्यिक पत्रकार बाबू डिसोजा यांना मानाचा अनुरव साहित्य गौरव पुरस्कार २०२६ जाहीर

पुनावळे : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवडचे वरीष्ठ पत्रकार आणि ज्येष्ठ कवी बाबू डिसोजा यांना त्यांनी



केलेल्या सातत्यपूर्ण सामाजिक जाणीवेतून केलेल्या निरपेक्ष सामाजिक कार्याची दखल घेऊन कर्तव्यप्रभेचा, सृजन प्रतिभेचा गौरव म्हणून कलानुरव कल्याणकारी सामाजिक संस्था आनंदनगर पुणे द्वारा अनुरव साहित्य कला, क्रीडा अकादमी चा स्व.लक्ष्मणराव कल्याणकर व स्व.गुंडेराव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ "अनुरव साहित्य गौरव पुरस्कार २०२६ "जाहीर झाला असून तसे निवडपत्र संस्थेच्या अध्यक्षा मा.अनुजा कल्याणकर आणि सचिव मा.लता कुलकर्णी यांनी बाबू डिसोजा यांच्या पुनावळे निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम अकरा हजार,पुणेरी पगडी आणि शाल देऊन भव्य कार्यक्रमात त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड च्या साहित्यिकांनी, साहित्य संस्थांनी त्यांचे फोनद्वारे तसेच भेटून अभिनंदन केले.

पाणी बचतीसाठी महापालिकेच्या सर्व विभागांनी दक्षता घ्यावी

पिंपरी : दैनिक संध्या

पाणी बचत करण्यासोबतच पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड



महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांना तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. याबाबतचे परिपत्रक आयुक्तांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहे. पाणी बचत व पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी देण्यात आलेल्या निर्देशांची अंमलबजावणी संबंधित विभागप्रमुखांनी त्यांच्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत करून घ्यावी. तसेच, या कामात दुर्लक्ष किंवा निष्काळजीपणा केल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड शहरासाठी पवना धरणातून ६.५५ टीएमसी, भामा आसखेड धरणातून २.१५ टीएमसी व आंद्रा धरणातून १.२९ टीएमसी असे एकूण ९.९९ टीएमसी पाणी आरक्षण मंजूर आहे. शहराची अंदाजित लोकसंख्या ३८ लाख असून, शहरात दररोज सुमारे ६५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होत असून, सध्या वितरण व्यवस्थेनुसार शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पवना धरणामध्ये १४ ऑक्टोबर २०२६ अखेर ९७.१७ टक्के, तर आंद्रा धरणामध्ये ९५.८० टक्के पाणीसाठा होता. सप्टेंबर २०२६ मध्ये परतीचा पाऊस न झाल्याने उपलब्ध पाणीसाठा व मागील वर्षाचा अनुभव विचारात घेऊन पाणी बचतीच्या अनुषंगाने विविध उपाययोजना राबवण्याचे निर्देश आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिले आहेत.



राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे जल्लोषात स्वागत

■ पिंपरी (दै. संध्या)

राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता आणि अंमली पदार्थांविरोधात जनजागृतीचा संदेश घेऊन दक्षिण भारतातून सुरू झालेल्या राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत उत्साहपूर्ण वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. रावेत येथील डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित कार्यक्रमात ढोल-ताशांचा गजर, पुष्पवृष्टी आणि जल्लोषात विविध राज्यांतून आलेल्या बाईक रायडर्सचे स्वागत करण्यात आले.

पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता, बंधुभाव आणि नशामुक्त भारताचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

राष्ट्रीय एकता बाईक रॅलीचे डी. वाय. पाटील महाविद्यालय, रावेत येथे आगमन होताच उपस्थितांनी ढोल-ताशांच्या गजरात रायडर्सचे स्वागत केले. बाईक रायडर्सवर पुष्पवृष्टी करून त्यांचा उत्साह वाढविण्यात आला. या स्वागतामुळे संपूर्ण परिसरात राष्ट्रीय एकता आणि नशामुक्त भारताचा संदेश देणारे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या वतीने पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते विविध राज्यांतून आलेल्या बाईक रायडर्सना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या राष्ट्रीय एकता बाईक रॅलीमध्ये पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील तब्बल १०० बाईक रायडर्सनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कार्यक्रमाला पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) रोहिदास पवार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-१) संदीप आटोळे, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-२) प्रदीप जाधव, पोलीस उपायुक्त (वाहतूक) विक्रांत देशमुख, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) सचिन कदम यांच्यासह अंमली पदार्थविरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार, विविध राज्यांतून आलेले बाईक रायडर्स आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून राष्ट्रीय एकता बाईक रॅलीला पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले. दक्षिण भारतातून सुरू झालेली ही राष्ट्रीय एकता बाईक रॅली देशाच्या विविध भागांतून प्रवास करत असून, ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त केवडिया, एकतानगर येथे पोहोचणार आहे. राष्ट्रीय एकता, देशाची अखंडता आणि बंधुभावाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासोबतच युवा पिढीमध्ये अंमली पदार्थविरोधात जनजागृती करणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला डी. वाय. पाटील महाविद्यालय, रावेत येथे मिळालेला उत्स्फूर्त आणि भव्य प्रतिसाद हा राष्ट्रीय एकता व नशामुक्त भारताच्या संदेशाला युवकांकडून मिळणाऱ्या सकारात्मक प्रतिसादाचे प्रतीक ठरला.हा संदेश देत पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने राष्ट्रीय एकता बाईक रॅलीतील सर्व रायडर्सना पुढील प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

आकाश कंदिल खरेदीव्दारे दिव्यांगांना आर्थिक मदत; श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा उपक्रम

■ पिंपळे सौदागर (दै. संध्या)



सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी दिव्यांगांनी तयार केलेल्या आकाश कंदिलांची खरेदी करुन त्यांना दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आर्थिक मदत केली. गुरुवार दि. २२ रोजी स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणाच्या परिसरात झालेल्या मासिक सभेत हा उपक्रम राबविण्यात आला.

दिव्यांगांच्या हितासाठी, त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी नाशिकच्या सक्षम या संस्थेच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. आकाश कंदिलांची निर्मिती हा त्यापैकीच एक उपक्रम असून अतिशय अल्प दरात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आकाशकंदिलांची खरेदी करुन दिव्यांगांना मदत करावी असे आवाहन सक्षम संस्थेचे पिंपरी चिंचवड येथील प्रमुख राजा पटवर्धन आणि त्यांचे सहकारी राजेंद्र देशमुख यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मासिक सभेसाठी उपस्थित पदाधिकारी आणि सदस्यांनी मोठ्या प्रमाणावर आकाश कंदिलांची खरेदी केली.

सदरील मासिक सभेचा प्रारंभ संत ज्ञानेश्वर महाराज यांचे प्रतिमा पूजन आणि दिपप्रज्वलनाने करण्यात आला. त्यानंतर मीनाक्षी कुलकर्णी आणि सुरेखा कुलकर्णी यांनी आदिमाया आदिशक्ती देवीचा महिमा वर्णन करणारे स्तुतीगीत सादर केले. विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात रमेश भट यांनी

प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सदस्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा चिंचवडकर यांनी केले तर अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. बाळकृष्ण रघुनाथ वाघेरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी गावातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. बाळकृष्ण रघुनाथ वाघेरे यांच्या निधनामुळे वाघेरे कुटुंबीयांसह परिसरात शोककळा पसरली आहे. नगरसेवक तथा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सदस्य श्री. संदीप बाळकृष्ण वाघेरे यांचे ते वडील होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांनी आपला ज्येष्ठ आधार गमावला आहे.

कै. बाळकृष्ण रघुनाथ वाघेरे यांनी सामाजिक क्षेत्रात योगदान दिले होते. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत अनेकांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

कै. बाळकृष्ण रघुनाथ वाघेरे यांचा दशक्रिया विधी सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता पवना नदीकाठी, पिंपरी वाघेरे गाव येथे आयोजित करण्यात आला आहे.या प्रसंगी प्रवचन सेवा ह.भ.प. अॅड. शंकर महाराज शेवाळे यांची होणार असल्याचे श्रद्धांजली पत्रिकेत नमूद करण्यात आले आहे.

कै. बाळकृष्ण रघुनाथ वाघेरे यांच्या पश्चात प्रदीप बाळकृष्ण वाघेरे, माणिक बाळकृष्ण वाघेरे, संदीप बाळकृष्ण वाघेरे यांच्यासह कुटुंबीय, नातलग असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने वाघेरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या आठवणी सदैव स्मरणात राहतील.

नववीतील विद्यार्थ्याचा अल्पवयीन मुलीवर चाकूने हल्ला

■ पिंपरी (दै. संध्या)



बावधन पोलीस ठाण्याच्या हद्दीत महाळुंगे गावात एका अल्पवयीन मुलीवर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि.२३) दुपारी सव्वादोन वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात मुलगी जखमी झाली असून, तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तिची प्रकृती स्थिर असून उपचार सुरू आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, महाळुंगे गावातील एका शाळेची सहल १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी पाचगणी-महाबळेश्वर येथे गेली होती. या सहलीदरम्यान एका कार्यक्रमात मुली डान्स करत असतानाचा व्हिडिओ इयत्ता नववीत शिकणाऱ्या एका विधिसंघर्षित बालकाने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पाठवला होता. या व्हिडिओवरून संबंधित मुलांमध्ये वाद झाला होता. त्यानंतर त्या मुलाला व्हिडिओ डिलीट करावा लागला होता. याच वादाचा राग मनात धरून संबंधित मुलाने आज दुपारी मुलीवर चाकूने हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या हल्ल्यात मुलगी जखमी झाली असून, तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.दरम्यान, बावधन पोलिसांनी जखमी मुलीचा जबाब नोंदवला असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हल्ला केल्याचा आरोप असलेल्या विधिसंघर्षित बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

महात्मा फुले द्विशताब्दी जयंतीनिमित्त काँग्रेसतर्फे कार्यक्रमाचे आयोजन

■ पिंपरी (दै. संध्या)



क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती उत्सवानिमित्त अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभाग व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अंतर्गत सोमवार, दि.२६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा फुले यांच्या सामाजिक समता, बंधुता, शिक्षण आणि सत्यशोधक विचारांचा जागर या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ भूषविणार असून, उद्घाटन विधान परिषदेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय ओबीसी विभागाचे उपाध्यक्ष तथा अखिल भारतीय काँग्रेसचे नेते भानुदास माळी, महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे माजी आमदार व 'शिदोरी'चे संपादक अनंतराव मोहोड आणि पनवेल शहर काँग्रेसच्या अध्यक्षा श्रुती म्हात्रे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते हनुमंत पवार यांचे यावेळी मार्गदर्शन होणार आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी वंचित, शोषित आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी केलेले कार्य, स्त्रीशिक्षणासाठी दिलेले योगदान तसेच सामाजिक समता आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न यांचा गौरव या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणाऱ्या मान्यवरांना 'महात्मा फुले कार्य गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, महात्मा फुले विचारांचे अनुयायी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक, समतावादी आणि पुरोगामी विचारांचा प्रसार करून नव्या पिढीला त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळावी, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सोमनाथ शेळके, विष्णुपंत नेवाळे आणि संदेश नवले यांच्यासह कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

पथनाट्यातून स्वच्छतेचा जागर... ताथवडेतील विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छतेचा संदेश

■ पिंपरी (दै. संध्या)

स्वच्छ शहराच्या निर्मितीसाठी नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळेत पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांसह नागरिकांना कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून ताथवडे येथील जिल्हा परिषद शाळेत पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी प्रभावी संदेश दिला. ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे जमा करणे, रस्त्यावर कचरा न टाकणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे या विषयांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. स्वच्छ शहर घडविण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांसोबतच नागरिकांचा सक्रिय



सहभागही तितकाच महत्त्वाचा असल्याचे या माध्यमातून अधोरेखित करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेच्या सवयी रुजविणे आणि त्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश घराघरांत पोहोचविणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या नियमांचे पालन केल्यास परिसर स्वच्छ ठेवण्यास मदत होते, याची जाणीवही विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. या उपक्रमाला 'ज' क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने आणि आरोग्य निरीक्षक कोमल फर्डे यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वच्छता ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असून, आपल्या कचऱ्याचे ओला, सुका सॅनिटरी, विशेष काळजी योग्य कचरा अशा चार प्रकारे योग्य वर्गीकरण करून तो महापालिकेच्या घंटागाडीला देणे आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे या सवयी प्रत्येकाने अंगीकाराव्यात.

थोडक्यात पण महत्वाचे



वाल्हेत पदवीधर मतदान प्रक्रिया शांततेत

वाल्हे : दैनिक संध्या

पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया वाल्हे (ता पुरंदर) येथील महर्षी वाल्मिकी विद्यालय मतदान केंद्रावर शांततापूर्ण आणि उत्साही वातावरणात पार पडली.यावेळी परिसरातील सुशिक्षित मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात मोठ्या जबाबदारीने सहभाग घेत आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी वाल्हे परिसरातील तरुण मतदारांसह ज्येष्ठ नागरिकांमध्ये सकाळपासूनच मतदानासाठी मोठा उत्साह दिसून आला. यावेळी निवडणूक प्रक्रिये दरम्यान पदवीधर मतदान केंद्रावरील बुथ क्रमांक ८२ मध्ये ४५२ पैकी ३१२ तर बुथ क्रमांक ८३ मध्ये ४५४ पैकी २६५ मतदान झाले . त्यामुळे पदवीधर मतदारसंघात ९०६ पैकी ५७७ जणांनी मतदानाचा हक्क बजाविल्याने ६३.६९ टक्के मतदान झाले आहे. तर शिक्षक मतदार संघात ८९ पैकी ६५ जणांनी मतदान केल्याने ७३ .०३ टक्के मतदान झाले आहे. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून अजिंक्य पुजारी तसेच राजकुमार बामणे यांनी काम पाहिले तर जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार दीपक काशिद तसेच भाऊसाहेब भोंगळे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

ह. भ. प. गायकवाड महाराज यांच्या नेतृत्वातून पंढरपूर येथे हरिनाम सप्ताह

नारायणगाव : दैनिक संध्या

परमपूज्य श्री अनंत घोष तथा मौनीबाबा यांच्या कृपेने अखंड हरिनाम सप्ताह आणि सव्वा कोटी विठ्ठल नामजप संकल्प सोहळ्याचे आयोजन पंढरपूर येथील श्री चैतन्य महाराज मठ ,गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे वारकरी भवन येथे शनिवार दिनांक 24 ऑक्टोबर 2026 ते शनिवार दिनांक 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत हा हरिनाम सप्ताह सोहळा संपन्न होणार आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने दररोज सकाळी आठ ते नऊ या वेळेत ह. भ. प. गुरुवर्य कैलास महाराज राऊत बुलढाणा यांचे ज्ञानेश्वरी पारायण प्रवचन होईल. तसेच सातही दिवस विविध नामांकित कीर्तनकारांची प्रवचने, कीर्तनाचे आयोजनात ह. भ. प. त्रिंबक महाराज राऊत, कैलास महाराज राऊत , मुरलीधर महाराज शिंदे, नामदेव महाराज लबडे, ह.भ.प. मंजाभाऊ महाराज राजगुरू, बाळासाहेब महाराज माऊली देगलूरकर, रामदास महाराज गावडे, शंकर महाराज बडवे, युवराज महाराज गायकवाड, निवृत्ती महाराज नामदास, पोपट महाराज डुंबरे, चैतन्य महाराज देगलूरकर, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, राजेंद्र महाराज पापडे आदी संत कृपांची सेवा घडणार आहे. 31 डिसेंबर 2026 रोजी सकाळी ह .भ. प. विठ्ठल महाराज यांचे काल्याचे किर्तन होऊन हा हरिनाम सप्ताह दुसऱ्या वर्षाचा सोहळा संपन्न होणार आहे. सप्ताहाच्या निमित्ताने पंढरपूर येथे भगवान परमात्मा विठ्ठल नामजप ग्रंथांचे मिरवणूक करून प्रत्येक वर्षी या ग्रंथांचे विठ्ठलाच्या चरणी समर्पित करण्याचा संकल्प बाळासाहेब गायकवाड महाराज यांनी केला आहे. या हरिनाम सप्ताहाचे सुंदर आयोजन नियोजन ह .भ.प भागवताचार्य बाळासाहेब गायकवाड वळतीकर तालुका आंबेगाव आणि वळती गावचे ग्रामस्थ व गायकवाड महाराज यांचा भक्तगण यांच्या नेतृत्वातून नियोजन करण्यात आले आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात मुलगी जखमी

नारायणगाव: दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील बोरी बुद्रुक गावठाणातील नंदीवाले वस्ती येथे भरवस्तीत बिबट्याने १७ वर्षीय मुलीवर हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात जयश्री दगडू पवार ही मुलगी जखमी झाली असून, तिला पुढील उपचारांसाठी नारायणगाव येथील सरकारी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जयश्री पवार ही रात्री साडेनऊच्या सुमारास लघुशंकेसाठी घराबाहेर गेली होती. त्याचवेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने तिच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात तिच्या पायाला दुखापत झाली. घटनेनंतर तिला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले असून, तिच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी वनपाल गणेश बागडे आणि ऋषिकेश गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. गावठाणातील भरवस्तीतच बिबट्याने हल्ला केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही नागरिकांसाठी धोकादायक ठरत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. वनविभागाने बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

एकदिवसीय ग्राम सर्वेक्षण शिबिर संपन्न

सासवड : दैनिक संध्या

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एकदिवसीय ग्राम सर्वेक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील आदर्श गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरंदर तालुक्यातील 'आडाची वाडी' येथे या सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आडाची वाडी येथील ग्रामस्थ अरविंद पवार आणि मयूर पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अरविंद पवार यांनी, " आडाची वाडी गावाचा विकास करण्यासाठी गावातील सध्या महसूल विभागात निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले मा. संदेश शिर्के यांनी गावाला एकत्र करून प्रत्येक कामाचे मायक्रो प्लॅनिंग केले. त्यानुसार ग्रामस्थांनी एकत्र येऊन एकजुटीने काम केले. यामध्ये एक रुपयाचाही भ्रष्टाचार नाही. पारदर्शकपणे काम केलेल्याची पावती ही आमच्या गावाला मिळाली, " असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. तर मयूर पवार यांनी, "सर्व गावाची माहिती डिजिटल पद्धतीने मिळण्यासाठी गावाची एक वेबसाईट तयार केली. या वेबसाईटमुळे आडाची वाडी हे गाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचले आहे," असे सांगितले. प्राचार्य डॉ. तुषार शितोळे उदघाटन प्रसंगी बोलताना म्हणाले, "कोणत्याही गावाचा शाश्वत विकास हा तेथील विज्ञानवादी दृष्टिकोनामुळे होत असतो. हा विज्ञानवादी दृष्टिकोन ठेऊन अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक प्रत्यक्ष गावात जाऊन वैज्ञानिक सर्वेक्षण करणार आहेत हे अत्यंत कौतुकास्पद आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता गावातील माती, पाणी, वनस्पती आणि सामाजिक-आर्थिक, राजकीय, साहित्यिक, भौगोलिक,पर्यटन घटकांचा अभ्यास केल्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तववादी परिस्थितीची जाणीव होते". या उदघाटन सत्राचे अध्यक्षस्थान अण्णासाहेब मगर महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी भूषविले. अध्यक्षस्थानी बोलताना ते म्हणाले, "ग्रामीण भागाचा सर्वांगीण अभ्यास आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून गावाचा विकास साधणे हाच या सर्वेक्षणाचा मुख्य हेतू आहे.

शॉर्टसर्किटमुळे कंपनीतील युनिटला भीषण आग

■ चाकण (दै. संध्या)

शॉर्टसर्किटमुळे खेड तालुक्यातील मोई येथील एमटेक कंपनीच्या युनिटमध्ये शुक्रवारी भीषण आग लागली. आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केल्याने कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले. सुदैवाने कंपनीला सुट्टी असल्याने युनिटमध्ये कामगार उपस्थित नव्हते. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

आगीची माहिती मिळताच चाकण नगरपरिषद आणि एमआयडीसीतील अग्निशमन दलाची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. वेळीच आग आटोक्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, अग्निशमन दलाची वाहने वाहतूक कोंडीत अडकल्याने ती वेळेत घटनास्थळी पोहोचली असती, तर नुकसानीची तीव्रता कमी राहिली असती, अशी चर्चा परिसरात होत आहे.

चाकण औद्योगिक पट्ट्यात अवजड वाहनांची वर्दळ आणि वारंवार होणारी वाहतूक कोंडी ही गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक आगीसारखी आपत्कालीन घटना घडल्यास अग्निशमन दलाच्या प्रतिसादाला अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे औद्योगिक परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासोबतच आपत्कालीन वाहनांसाठी मार्ग तत्काळ मोकळा करून देण्याची यंत्रणा सक्षम करण्याची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे.

औद्योगिक परिसरातील अग्निसुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेबाबत प्रशासनाने गांभीर्याने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.



शिरूर-हवेलीच्या पाणी नियोजनासाठी लवकरच महत्त्वपूर्ण बैठक : आमदार कटके



■ लोणी काळभोर (दै. संध्या)

शिरूर-हवेली विधानसभा मतदारसंघातील भीमा नदीकाठच्या गावांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी आमदार माऊली आबा कटके यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवला आहे. या अनुषंगाने पुणे पाठबंधारे विभाची कालवा सल्लागार समितीची बैठक लवकरच होणार असल्याची माहिती त्यांनी दिली .

भीमा नदीमधील पाणीसाठा आटल्यामुळे परिसरातील प्रादेशिक व स्थानिक पाणीपुरवठा योजनांवर परिणाम झाला आहे. परिणामी, वाघोली पंचक्रोशीतील सुमारे एक लाख नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या परिस्थितीची दखल घेत आमदार कटके यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र देऊन भीमा नदीवरील सर्व बंधाऱ्यांमध्ये तातडीने पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. तसेच, भीमा नदीतील उपलब्ध जलसाठ्याचा आढावा घेऊन पाणी नियोजनासाठी पुणे पाठबंधारे विभागाची कालवा सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्याची मागणीही त्यांनी केली होती. त्या अनुषंगाने ही बैठक लवकरच पार पडणार आहे.

भीमा नदीवरील पाणीसाठ्याचे नियोजन करताना केवळ एका गावाचा विचार न करता नदीकाठच्या सर्व संबंधित गावांच्या गरजा लक्षात घेणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देतानाच शेतीच्या खरीप हंगामातील पिकांना सिंचनासाठी आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याची उपलब्धता तसेच उपलब्ध जलसाठ्याचा समतोल वापर याबाबत ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. त्यामुळे होणाऱ्या बैठकीत या प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना निश्चित होण्याकडे वाघोली पंचक्रोशीसह भीमा नदीकाठच्या गावांतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

आमदार माऊली आबा कटके यांनी सांगितले की " शिरूर - हवेली मतदार संघातल्या गावांतील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी आवश्यक पाणी नियोजन करण्याकरिता माझा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू आहे.

तसेच कुकडी सिंचन मंडळाची बैठक दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ३वाजता मंत्रालय मुंबई येथे होणार आहे. या बैठकीत शिरूर तालुक्यासह आजूबाजूच्या गावांचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी ठोस निर्णय होईल. पिण्याचे पाणी, शेतीच्या सिंचनासाठी पाणी आणि पशुधनाच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन उपलब्ध जलसाठ्याचे योग्य नियोजन करण्यावर माझा भर आहे."

भाजीपाल्याची आवक घटल्याने बाजारभावात वाढ



■ नारायणगाव(दै. संध्या)

पाणीटंचाई आणि वाढत्या तापमानाचा फटका भाजीपाला उत्पादनाला बसत असून, जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव उपबाजारात कोथिंबीर, मेथी आणि शेपूची आवक कमी झाली आहे. परिणामी, या भाजीपाल्याच्या बाजारभावात वाढ झाली आहे.

बुधवारी रात्री झालेल्या लिलावात चांगल्या दर्जाच्या कोथिंबिरीच्या एका जुडीला ४३ रुपये, तर मेथीच्या जुडीला ४४ रुपये भाव मिळाला. तसेच शेपूच्या जुडीला २५ रुपये बाजारभाव मिळाला.

ऑक्टोबर महिन्यातील वाढते तापमान आणि पाणीटंचाईमुळे मेथी व धणे बियांच्या उगवण क्षमतेत सुमारे ५० टक्क्यांनी घट झाली आहे. परिणामी, उत्पादन कमी होऊन बाजारातील आवक घटली आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी दिली. जुन्नर, आंबेगाव आणि शिरूर तालुक्यांतून नारायणगाव उपबाजारात कोथिंबीर, मेथी व शेपूच्या एकूण ३ लाख ७० हजार जुड्यांची आवक झाली. त्यामध्ये कोथिंबिरीच्या २ लाख ७५ हजार ४०० जुड्यांचा समावेश होता. भाजीपाल्याच्या वाढलेल्या दराचा कळंब येथील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा झाला. शेतकरी ओंकार भालेराव यांनी विक्रीसाठी आणलेल्या कोथिंबिरीच्या दोन हजार जुड्यांना शेकड्याला चार हजार रुपये बाजारभाव मिळाला. तर संजय भालेराव यांनी विक्रीसाठी आणलेल्या मेथीच्या सहा हजार जुड्यांना शेकड्याला चार हजार चारशे रुपये उच्चांकी भाव मिळाला, अशी माहिती उपसचिव शरद घोंगडे यांनी दिली. दरम्यान, टोमॅटो बाजारात सुमारे २३ हजार क्रेटची आवक झाली. सकाळच्या लिलावात प्रतवारीनुसार २० किलो वजनाच्या टोमॅटो क्रेटला १०१ ते ३५१ रुपये दर मिळाला. टोमॅटोचे बाजारभाव स्थिर असल्याची माहिती संचालक सारंग घोलप यांनी दिली.

विवाहितेचा छळ; पतीसह सासरच्या पाच जणांवर गुन्हा

■ न्हावरे : (दै. संध्या)

आंबळे (ता. शिरूर) येथील विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून पैशांची मागणी केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी गायत्री विकी पवार (वय २५) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पती विकी रामदास पवार (वय २८), सासू मीना रामदास पवार (वय ५५), दीर किरण रामदास पवार (वय ३३), जाऊ शिवानी किरण पवार (वय २७) आणि नणंद निलम विजय साळुंके (वय ३०, सर्व रा. आंबळे, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. गेली ६ वर्षे सासरच्या मंडळींकडून शारीरिक व मानसिक छळ होत असल्याचे गायत्री पवार यांनी फिर्यादीत म्हटले आहे. मुलगा होत नसल्याच्या कारणावरून मुलगी हिसकावून घेण्याची तसेच पतीचे दुसरे लग्न लावून देण्याची धमकी दिली जात होती. पतीने नवीन चारचाकी वाहन घेतल्याने त्याच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी माहेरून १० लाख रुपये आणण्याची मागणी केली. तसेच पतीविरुद्ध यापूर्वी घडलेल्या एका प्रकरणाचा राग मनात धरून फिर्यादीला एका मुलीला भेटून तिला मारहाण करण्यास सांगण्यात आले. मात्र, गायत्री पवार यांनी नकार दिल्यानंतर त्यांची मुलगी शर्वरी हिला हिसकावून घेऊन त्यांना घराबाहेर काढल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

पिंपळसुटीत दहा एकर ऊस जळून खाक!

■ शिरूर (दै. संध्या)

पिंपळसुटी (ता. शिरूर) : हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने पिंपळसुटी येथील चार शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. मुख्य विद्युत वाहिनीची तार तुटून उसाच्या शेतात आग लागल्याने सुमारे साडेनऊ एकर ऊस जळून खाक झाला. रविवारी (ता. ११) दुपारी दोनच्या सुमारास घडलेल्या या घटनेत ऊस पिकासह सुमारे एक हजार फूट पाइपलाइन आणि ठिबक सिंचन संचही जळून खाक झाला. या आगीत अंदाजे २० ते २२ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज असून, बाधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे.

पिंपळसुटी येथील गट क्रमांक २७० मधील क्षेत्र क्रमांक १, २, ३ आणि ४ मधील



उसाच्या शेतात मुख्य विद्युत वाहिनीची तार तुटल्याने आग लागली. सुरुवातीला बाळासाहेब फराटे यांच्या उसाने पेट घेतला. त्यातच जोरदार वारा सुटल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा वेगाने शेजारील शेतांमध्ये पसरल्याने रावसाहेब फराटे, मानसिंग फराटे आणि अनिकेत आप्पासो फराटे यांच्या उसालाही आगीने वेढले. दरम्यान, गट क्रमांक २७१/१ मधील सुनील बाळासाहेब फराटे यांचाही सुमारे एक एकर ऊस या आगीत जळाला. वाऱ्याचा वेग आणि आगीची तीव्रता यामुळे काही वेळातच मोठ्या क्षेत्रातील ऊस भस्मसात झाला. ऊस पिकासह सिंचन व्यवस्थाही खाक या आगीत तोडणीला आलेल्या उसाचे मोठे नुकसान झाले आहे. उसाच्या उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी केलेली मशागत, खते, औषधे, पाणी आणि मजुरीवरील गुंतवणूक वाया गेली आहे. त्यातच सुमारे एक हजार फूट चार इंची पाइपलाइन आणि ठिबक सिंचन संच जळाल्याने सिंचन व्यवस्थेचेही नुकसान झाले आहे. ऊस तोडणीच्या टप्प्यावर असताना ही दुर्घटना घडल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे.

हातभट्टी दारू अड्ड्यांवर पोलिसांचा छापा; १ लाख २४ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर शहरातील मार्केट यार्डसमोरील गोपाळवस्ती परिसरात गावठी हातभट्टी दारूची निर्मिती आणि अवैध विक्री सुरू असल्याचे आढळून आल्याने शिरूर पोलिसांनी बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी मोठी कारवाई केली. या कारवाईत तयार गावठी दारू आणि दारूनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे कच्चे रसायन असा एकूण १ लाख २४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार जणांना अटक करण्यात आली आहे. अन्य नऊ जणांचा पोलीस शोध घेत आहेत.

पोलिसांनी गोपाळवस्ती परिसरात कारवाई केली असता, विविध ठिकाणी गावठी हातभट्टी दारू तयार करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे आढळून आले. तसेच तयार दारू आणि दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे कच्चे रसायन साठवून ठेवल्याचेही निदर्शनास आले. पोलिसांनी घटनास्थळावरून हा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी नंदा जनार्दन पवार (वय ५०), मीना युवराज गव्हाणे (वय ३५), राहुल विश्वनाथ पवार (वय ३५) आणि सुभाष विश्वनाथ पवार (वय ४४, सर्व रा. गोपाळवस्ती, मार्केट यार्डसमोर, शिरूर) यांना अटक करण्यात आली आहे. तर




कविता किरण पवार, कमल जयसिंग गव्हाणे, सतीश जयसिंग गव्हाणे, सरस्वती पवार, सविता राजकुमार गिरे, संजय छबुराव जाधव, रमेश छबुराव जाधव, राजेंद्र छबुराव जाधव आणि उमेश संजय जाधव हे अन्य नऊ आरोपी अद्याप फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे.

पोलिसांची चाहूल लागताच काही जण घटनास्थळावरून पळून गेल्याची माहिती पोलिसांनी दिली.याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९५१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३ तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क), ६५ (फ) आणि ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव भोसले आणि पोलीस पथकाने ही कारवाई केली.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नकाते करीत असून, गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हवालदार टेंगले यांनी केली.गोपाळवस्ती परिसरातील या कारवाईमुळे अवैध हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्रीचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, या व्यवसायात सहभागी असलेल्या इतरांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



जन आरोग्य योजना अधिक पारदर्शक व प्रभावी करणार : मुख्यमंत्री फडणवीस

■ नागपूर(दै. संध्या)

सर्वसामान्य जनतेला चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना अधिक पारदर्शक व प्रभावी पद्धतीने राबविण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

वर्धमान नगर परिसरात अत्याधुनिक सुविधा असलेल्या मल्टीस्पेशालिटी न्यू एरा हॉस्पिटलचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी खासदार अजय संचेती, विजय दर्डा, आमदार कृष्णा खोपडे, चैनसुख संचेती, न्यू एरा हॉस्पिटलचे प्रमुख आनंद संचेती, उज्वल पगारिया, डॉ. निलेश अग्रवाल, हेल्थकेअर इन्व्हेस्टमेंटच्या प्रियंका सावंत, विधिरा मिश्रा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूर मेडिकल हब म्हणून ओळखले जाते. मेडिकल केअरमध्ये राज्यासह देशात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे मेडिकल टुरिझमला चालना मिळत आहे. अत्याधुनिक आरोग्य सुविधांमुळे विविध देश आरोग्य सुविधेसाठी भारताला प्राधान्य देत आहेत.

राज्यात अत्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासोबतच सर्वसामान्य जनतेला परवडेल अशा पद्धतीने आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी दोन हजार ४०० आजारांचा जन आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. न्यू एरा हॉस्पिटलमध्ये अत्यंत दर्जेदार व अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील असा विश्वासही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. संचालक डॉ. आनंद संचेती यांनी स्वागत करून प्रास्ताविकात न्यू एरा रुग्णालयात उपलब्ध सुविधांची माहिती दिली. या रुग्णालयात ३०० बेडची सुविधा असून एआय डिजिटल मेमोग्राफी, तत्काळ एमआरआय करण्याची सुविधा यामुळे कर्करुग्णांना दिलासा मिळणार आहे. या संस्थेतर्फे विविध प्रकल्प राबविण्यात येत असून भविष्यात रुग्णसेवेसाठी विविध प्रकल्प सुरू होणार असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. आभार निलेश अग्रवाल यांनी मानले.



थोडक्यात पण महत्वाचे



नांदेड जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी शांततेत मतदान

नांदेड (दैनिक संध्या) : औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नांदेड जिल्ह्यात आज, २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सुरू झालेली मतदान प्रक्रिया सायंकाळी ४ वाजेपर्यंत शांततेत व सुरळीत पार पडली. जिल्ह्यातील सर्व १२० मतदान केंद्रांवर चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. सायंकाळी ४ वाजेपर्यंत जिल्ह्यात अंदाजे ५९.८१ टक्के मतदानाची नोंद झाली. जिल्ह्यात सकाळी ८ ते १० या वेळेत ७.५४ टक्के, दुपारी १२ वाजेपर्यंत २१.२० टक्के, तर दुपारी २ वाजेपर्यंत ३७.४३ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर मतदानाचा टक्का वाढत सायंकाळी ४ वाजेपर्यंत ५९.८१ टक्क्यांवर पोहोचला. संपूर्ण मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि शांततेत पार पडली. जिल्ह्यातील मतदारयादीत एकूण ३६ हजार ६८७ मतदारांची नोंद होती. त्यापैकी २१ हजार ९४२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये २८ हजार ६९४ पुरुष मतदारांपैकी १८ हजार १८० पुरुषांनी, तर ७ हजार ९९० महिला मतदारांपैकी ३ हजार ७६१ महिलांनी मतदान केले. तसेच, तीन इतर मतदारांपैकी एका मतदाराने मतदान केले. महिला मतदारांच्या तुलनेत पुरुष मतदारांचा सहभाग अधिक राहिला.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत ९१.०८ टक्के मतदान

अमरावती (दैनिकसंध्या):विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील ८१ मतदान केंद्रांवर शांततेत व निर्भय वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी जवळपास ९१.०८ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी दिली. आज सकाळी ८ वाजता सर्व मतदान केंद्रांवर शांततेत मतदानास सुरुवात झाली. मतदानासाठी विभागातील पाच जिल्ह्यांत ८१ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली होती. सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदानासाठी वेळ देण्यात आली होती. अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण मतदारांची संख्या ३५ हजार ८१० असून, त्यापैकी ३२ हजार ६१६ मतदारांनी मतदान केले आहे. जिल्हानिहाय एकूण मतदानाची माहिती पुढीलप्रमाणे आहे. अमरावती- १०,०९७ पैकी ९,०२३ (८९.३६ टक्के), अकोला - ५,९४२ पैकी ५,४७४ (९२.१२ टक्के), बुलढाणा - ९,१२४ पैकी ८,२८० (९०.७५ टक्के), वाशिम - ३,७१५ पैकी ३,४५० (९२.८७ टक्के) आणि यवतमाळ - ६,९३२ पैकी ६,३८९ (९२.१७ टक्के) मतदारांनी, म्हणजे एकूण जवळपास ९१.०८ टक्के मतदारांनी, आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीसाठी जिल्हानिहाय एकूण मतदान केंद्रांची संख्या पुढीलप्रमाणे होती. अमरावती - २५, अकोला - १३, बुलढाणा - १८, वाशिम - ७ आणि यवतमाळ - १८, अशी एकूण ८१ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली होती.

पदवीधर मतदारसंघासाठी चंद्रपूर जिल्ह्यात ७२.५९ टक्के मतदान

चंद्रपूर (दैनिक संध्या) : नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीत चंद्रपूर जिल्ह्यात ७२.५९ टक्के मतदान झाले. शुक्रवारी (दि. २३) सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत जिल्ह्यातील २३ हजार ४१९ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ३२ हजार २६२ मतदार असून, पुरुष मतदारांची संख्या २० हजार ९०५, तर महिला मतदारांची संख्या ११ हजार ३५७ आहे. जिल्ह्यातील ५८ मतदान केंद्रांवर झालेल्या या निवडणुकीत १५ हजार ८४२ पुरुष मतदारांनी (७५.७८ टक्के), तर ७ हजार ५७७ महिला मतदारांनी (६६.७२ टक्के) मतदान केले.


उपसभापती सचिन अहिर दोन दिवसीय कर्नाटक दौऱ्यावर

■ मुंबई (दै. संध्या)

विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर सध्या दोन दिवसीय कर्नाटक दौऱ्यावर असून, दौऱ्याच्या पहिल्या दिवशी त्यांनी कर्नाटकच्या विधान भवनाला भेट दिली.

कर्नाटक राज्याच्या विधान परिषद कामकाजनिमित्त आयोजित या अभ्यास दौऱ्यात उपसभापती सचिन अहिर यांनी कर्नाटक विधान परिषदेचे सभापती सलिम अहेमद आणि उपसभापती उमाश्री यांची सदिच्छा भेट घेतली. या सदिच्छा भेटीदरम्यान त्यांनी कर्नाटक विधान परिषदेच्या कामकाजाची सविस्तर माहिती घेत विविध विषयांवर चर्चा केली.

महाराष्ट्र राज्यात विधानसभा आणि विधान परिषद सदस्यांच्या विधिमंडळ कामकाजासाठी 'डॅशबोर्ड प्रणाली' यशस्वीपणे राबवली जात आहे. याच धर्तीवर अशीच आधुनिक डॅशबोर्ड प्रणाली कर्नाटक सरकारनेही आपल्या राज्यात लागू करावी, अशी संकल्पना उपसभापती सचिन अहिर यांनी मांडली. त्यावर कर्नाटक शासनाकडून या



प्रस्तावाचा अत्यंत सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले. तसेच, सलोख्याचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी उपसभापती सचिन अहिर यांनी कर्नाटक विधान परिषदेचे सभापती व उपसभापती यांना महाराष्ट्र विधान भवनाला भेट देण्याचे अधिकृत निमंत्रणही दिले.


कर्नाटक दौऱ्यात उपसभापती सचिन अहिर यांनी कर्नाटक राज्याचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री यू. टी. खादर यांचीही सदिच्छा भेट घेतली. या भेटीत आरोग्य क्षेत्रातील विविध उपक्रम व जनहिताच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या अभ्यास दौऱ्यावेळी उपसभापती सचिन अहिर यांच्यासोबत सचिव डॉ. विलास आठवले उपस्थित होते.

औरंगाबाद पदवीधर निवडणूक: बीड जिल्ह्यात ५९.६७ टक्के मतदान

■ बीड (दै. संध्या)

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या मतदानाची प्रक्रिया आज बीड जिल्ह्यात अत्यंत शांततेत, शिस्तबद्ध पद्धतीने आणि प्रशासनाच्या चोख बंदोबस्तात पार पडली. निवडणूक विभागाकडे प्राप्त झालेल्या अंतिम आकडेवारीनुसार, संपूर्ण जिल्ह्यात दिवसअखेर ५९.६७ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील एकूण ५७ हजार ६७२ नोंदणीकृत पदवीधर मतदारांपैकी तब्बल ३४ हजार ४१६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सकाळपासूनच मतदान केंद्रांवर मतदारांचा उत्साह संमिश्र स्वरूपाचा होता; मात्र दुपारनंतर मतदानाचा टक्का लक्षणीयरीत्या वाढल्याचे चित्र संपूर्ण जिल्ह्यात पाहायला मिळाले.

सकाळी आठ वाजता मतदानाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या दोन तासांत मतदानाचा वेग



काहीसा संथ होता. सकाळी १० वाजेपर्यंत जिल्ह्यात केवळ ८.१५ टक्के इतकेच मतदान झाले होते. मात्र, जसजसा दिवस पुढे सरकत गेला, तसतशी मतदारांची पावले मतदान केंद्रांकडे वळू लागली. सुशिक्षित आणि पदवीधर मतदारांचा हा मतदारसंघ असल्याने दुपारच्या सत्रात मतदान केंद्रांवर मोठी गर्दी दिसून आली आणि सायंकाळी चार वाजेपर्यंत एकूण मतदानाचा आकडा ५९ टक्क्यांच्या पुढे गेला. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया अत्यंत सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पडावी.

ॲड. नार्वेकर यांची सीपीए आंतरराष्ट्रीय संस्थेच्या कार्यकारी समितीवर भारत विभागाचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष तथा राष्ट्रकुल संसदीय मंडळ (सीपीए), महाराष्ट्र शाखेचे पदसिद्ध सह-अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय कार्यकारी समितीवर भारत सी.पी.ए. विभागाचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली आहे. महाराष्ट्र विधिमंडळ आणि राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेसाठी ही अत्यंत प्रतिष्ठेची व अभिमानास्पद बाब आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती आणि राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेचे पदसिद्ध सह-अध्यक्ष प्रा. राम शिंदे, उप सभापती सचिन अहिर, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी अभिनंदन केले.



कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन, हाऊसेस ऑफ पार्लमेंट, लंडन मुख्यालय उपमहासचिव जार्विस मातिया यांनी २० ऑक्टोबर २०२६ रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे ॲड. राहुल नार्वेकर यांचे आंतरराष्ट्रीय कार्यकारी समितीवर सदस्यपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल अभिनंदन आणि स्वागत केले आहे. केपटाऊन येथे गेल्याच महिन्यात झालेल्या राष्ट्रकुल संसदीय मंडळ आंतरराष्ट्रीय परिषदेच्या सर्वसाधारण सभेपूर्वी भारत विभागाचे कार्यकारी समितीवरील प्रतिनिधी म्हणून त्यांच्या निवडीवर शिक्कामोर्तब झाले होते. या नियुक्तीमुळे महाराष्ट्र विधिमंडळाला राष्ट्रकुलातील विविध देशांच्या प्रतिनिधीगृहांशी संवाद साधण्याची, संसदीय कामकाजातील उत्तम पद्धतींची देवाणघेवाण करण्याची तसेच लोकशाही संस्था अधिक सक्षम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर योगदान देण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

परीक्षा अर्जासाठी 'झिरो चलन' सुविधा उपलब्ध : पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, आतापर्यंत तब्बल २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्काचा एकही रुपया न भरता 'झिरो चलन' सुविधेद्वारे परीक्षा अर्ज दाखल केले आहेत, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी आणि पात्र विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी संचालनालय, विद्यापीठे आणि परीक्षा विभागाच्या स्तरावर आवश्यक यंत्रणा कार्यरत करण्यात आली



आहे. या प्रक्रियेचा विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे.

परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागू नये, यासाठी अर्ज प्रक्रियेत 'झिरो चलन' हा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही परीक्षा शुल्क न भरता परीक्षा अर्ज दाखल करता येत आहेत. तसेच, सर्व विद्यापीठांनी परीक्षा शुल्कमाफीच्या अंमलबजावणीसंदर्भात परिपत्रके जारी केली आहेत. दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी परीक्षा शुल्क भरले आहे, त्यांना भरलेले शुल्क परत करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त भागातील कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्कमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, तसेच विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ घेताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सर्व विद्यापीठांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीसंदर्भात शैक्षणिक अडचण असल्यास संबंधित विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ किंवा जनसंपर्क अधिकारी, विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन उच्च व इतर तंत्र शिक्षण विभागाने केले आहे. मुंबई विद्यापीठ, मुंबई - परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. पूजा रौंदळे (९३२२०२०५८९), जनसंपर्क अधिकारी लीलाधर बनसोड (९८३३९६९९७७). सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. राजेंद्र तलवारे (९८९०६४२४३१), विद्यार्थी विकास संचालक डॉ. सविता कुलकर्णी (७७२००३६७७४), तसेच अजय ठुबे (७५८८१६९१३४).

नागरिक सेवांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर; महाराष्ट्रात एकात्मिक डिजिटल यंत्रणेवर भर

■ मुंबई (दै. संध्या)

नागरिकांना शासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्यावर महाराष्ट्र शासनाचा भर असून, एकात्मिक डिजिटल सेवा प्रणाली आणि शेतीविषयक स्मार्ट मार्गदर्शनाच्या माध्यमातून नागरिकाभिमुख प्रशासनाला नवी दिशा देण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती प्रशासकीय यंत्रणांनी दिली. मंत्रालयात आयोजित 'प्रिल्यूड परिषद २०२६'मध्ये प्रशासकीय कामकाजातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, शासकीय योजनांची सुलभता आणि तंत्रज्ञानाधारित सेवा वितरणाच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली.

भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखेच्या वतीने 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील नागरिक सेवा' या विषयावर 'प्रिल्यूड परिषद २०२६'चे आयोजन मंत्रालयात करण्यात आले होते. भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या परिषदेत भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे मानद सचिव डॉ. विजय सतबीरसिंग, मानद कोषाध्यक्ष विकास देवधर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या आयुक्त भुवनेश्वरी एस., राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे वैज्ञानिक अमोद सूर्यवंशी आणि कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक मीनल करनवाल यांनी विषयतज्ज्ञ म्हणून सहभाग घेतला. प्रशासकीय सेवांमधील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका, तंत्रज्ञानाचा वापर आणि नागरिकाभिमुख प्रशासनाच्या विविध पैलूंवर या परिषदेत चर्चा करण्यात आली.

अध्यक्ष स्वाधीन क्षत्रिय यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले. भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या दिल्ली येथील राष्ट्रीय संस्थेकडून देशभरातील शाखांसाठी दरवर्षी एक समान विषय निश्चित केला जातो. यंदा 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील नागरिक सेवा' हा विषय निवडण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे सैद्धांतिक विवेचन करण्यापेक्षा प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजात तिचा वापर करून नागरिकांना कशा प्रकारे चांगल्या सेवा देता येतील, यावर परिषदेचा भर असल्याचे



क्षत्रिय यांनी स्पष्ट केले.

नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेक संकेतस्थळांवर नोंदणी करणे, कागदपत्रे सादर करणे आणि अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी वारंवार कार्यालयांना भेटी देणे अशा अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी महाराष्ट्र शासनाकडून एकात्मिक डिजिटल सेवा प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने नागरिकांना पात्र योजनांची माहिती, सुलभ अर्जप्रक्रिया आणि अधिक गतिमान सेवा उपलब्ध करून देण्याचे नियोजन असल्याचे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या आयुक्त भुवनेश्वरी एस. यांनी सांगितले.

नागरिकांना वारंवार विविध संकेतशब्द आणि एकवेळ वापरायचे संकेतांक मिळविण्याची गरज भासू नये, यासाठी 'महा आयडी'च्या माध्यमातून एकच प्रवेश व्यवस्था विकसित करण्यावर भर दिला जात आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या भ्रमणध्वनी क्रमांक आणि पडताळणीसंबंधी अडचणी लक्षात घेऊन ही व्यवस्था अधिक सुलभ करण्याचे नियोजन आहे. भविष्यात नागरिकांना त्यांच्या नैसर्गिक भाषेत संवाद साधून शासकीय सेवा आणि प्रमाणपत्रांसाठी अर्ज करता यावा, हाही या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे. नवीन योजना जाहीर झाल्यानंतर त्यांची संगणकीय प्रणालीवर अंमलबजावणी करण्यासाठी लागणारा कालावधी कमी करणे, पात्र नागरिकांना प्रमाणपत्रे स्वयंचलितपणे उपलब्ध करून देण्याच्या शक्यता तपासणे आणि विविध विभागांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढविणे, या दिशेनेही शासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे भुवनेश्वरी एस. यांनी नमूद केले.


कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने शेतीविषयक विविध माहितीचे एकत्रीकरण करून शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा 'महाविस्तार' उपक्रम महत्वाची भूमिका बजावत आहे. हवामानाचा अंदाज, पेरणी, पीक व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण, बाजारभाव आणि शासकीय योजनांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम विकसित करण्यात आला आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



पुणे पदवीधर मतदार व शिक्षक मतदार संघासाठी शांततेत मतदान

■ मतदान केंद्रावर पदवीधरसाठी सरासरी ६२.६७ टक्के;तर शिक्षकांसाठी सरासरी ८९.८२ टक्के मतदान

लोणी भापकर : दैनिक संध्या

पुणे पदवीधर मतदार व शिक्षक मतदार संघासाठी लोणी भापकर येथील केंद्रावर शांततेत मतदान झाल्याची माहिती स्थानिक प्रशासन अधिकारी व रविंद्र (काका) भापकर यांनी दिली.पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या मतदान करण्यासाठी जिल्हा परिषद शाळा लोणी भापकर येथे मतदान प्रक्रिया पार पडली.पदवीधर मतदार संघात ४७ उमेदवार तर शिक्षक मतदार संघात ३० उमेदवार निवडणूकीसाठी रिंगणात उभे होते.या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत मुख्य लढत होत असून काही अपक्ष उमेदवार यांनी देखील दोघांसमोर कडवे आव्हान उभे केले होते.लोणी भापकर पदवीधर व शिक्षक दोन बुथ होते.या केंद्रावर पदवीधरच्या १००२ मतदानापैकी ६२८ मतदारांनी मतदान केले.पदवीधर साठी सरासरी ६२.६७ टक्के,तर शिक्षकांच्या ५५ मतदाना पैकी ४५ मतदारांनी मतदान केले.शिक्षकांनी एकूण सरासरी ८९.८२ टक्के मतदान केले. यावेळी प्रशासनासह पक्षांचे स्थानिक पदाधिकारी व मतदार यांनी सहकार्य केले.



लासुर्णेतील अंगणवाडी क्रमांक दोनजवळ अस्वच्छतेचे साम्राज्य

■ चिमुकल्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

लोणी भापकर : दैनिक संध्या

लासुर्णे (ता. इंदापूर) : येथील अंगणवाडी क्रमांक दोनच्या शेजारील बोळात कचरा, घाण आणि लघुशंकेमुळे दुर्गंधी पसरली असून, परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. याच मार्गावरून अंगणवाडीतील चिमुकल्यांना मधल्या सुट्टीत तसेच घरी जाताना ये-जा करावी लागते. त्यामुळे लहान मुलांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असून, त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणापासून ग्रामपंचायत कार्यालय अगदी हाकेच्या अंतरावर आहे. तरीही या अस्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे. या समस्येबाबत अनेकदा तक्रारी करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. अंगणवाडी परिसर स्वच्छ आणि सुरक्षित असणे आवश्यक असताना, चिमुकल्यांना अशा दुर्गंधीयुक्त वातावरणातून मार्ग काढावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन बोळाची स्वच्छता करावी, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावावी आणि सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



मु. सा. काकडे महाविद्यालयाला विजेतेपद

सोमेश्वरनगर : दैनिक संध्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा अंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा दिनांक 17,18 व 19 ऑक्टोबर 2026 रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मैदानावर पार पडल्या.या स्पर्धेमध्ये एकूण 85 महाविद्यालयाने सहभाग नोंदविला.या स्पर्धेमध्ये सोमेश्वरनगर येथील मु सा.काकडे महाविद्यालयाने मुलांच्या गटाने सांघिक विजेतेपद मिळवले. विजेत्या संघातील खेळाडू पुढील प्रमाणे मयूर येळे 21 किलोमीटर धावणे प्रथम क्रमांक,कुणाल जाधव 21 किलोमीटर धावणे द्वितीय क्रमांक,सार्थक मोरे,सार्थक रणवरे,जगन्नाथ गडदरे,नवनाथ बरकडे,अभिषेक गार्डी,तुषार सोनवणे,संकेत होळकर,यश भोसले या खेळाडूंनी आपापल्या क्रीडा प्रकारामध्ये उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयाला सांघिक विजेतेपद मिळवून दिले,त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.सतीशराव काकडे- देशमुख,नियोजन व विकास समितीचे अध्यक्ष मा.अभिजीत भैया काकडे- देशमुख यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.देविदास वायदंडे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून भविष्यातील स्पर्धेसाठी त्यांना महाविद्यालयातर्फे जास्तीत जास्त क्रीडा सुविधा पुरविण्याचे आश्वासन दिले.तसेच त्यांच्या समस्या जाणून घेऊन महाविद्यालयातर्फे त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. महाविद्यालयाचे सचिव श्री.सतीश लकडे यांनी देखील विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.खेळाडूंना प्रा.बाळासाहेब मरगजे व प्रा.दत्तराज जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.

आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

पुणे : दैनिक संध्या

पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व व्यवस्थापन महाविद्यालयामध्ये "ॲडवान्सेस इन इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट' या विषयावरील तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पुणे विद्यार्थी गृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात ही परिषद होणार आहे. भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्थेचे सल्लागार व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, अलिकॉन ग्रुपचे स्ट्रॅटेजिक बिझनेस डेव्हलपमेंट हेड हर्षवर्धन गुणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (ता. २८) सकाळी १० वाजता या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. परिषदेचा समारोप सोहळा केंद्रीय गुप्तचर विभागातील अतिरिक्त सीमाशुल्क आयुक्त प्रसन्न दातार (आयआरएस) यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. ३०) होणार आहे, अशी माहिती संस्थेचे संचालक सुनील रेडेकर यांनी दिली. सुनील रेडेकर म्हणाले, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या क्षेत्रांतील नवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानातील प्रगती तसेच नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या आदानप्रदानासाठी संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ, संशोधन विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये एकूण आठ तांत्रिक विषयांचा समावेश असून, परिषदेसाठी एकूण १८६ संशोधन निबंध सादर करणार आहे. त्यापैकी १५ संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहेत. ही बाब परिषदेच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आणि संशोधन क्षेत्रातील सहभागाचे द्योतक आहे.

'एआय'मुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम, प्रभावी व सुसज्ज होईल

संतोष वारिक यांचे प्रतिपादन; 'पीएसपी-एएसआयएस कॉन्क्लेव्ह'मध्ये सुरक्षा क्षेत्रातील 'एआय'च्या वापरावर चर्चा

■ पुणे (दै. संध्या)

"कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापरामुळे सुरक्षा यंत्रणांमधील देखरेख आणि नियंत्रण अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून होणाऱ्या निरीक्षणामध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर केल्यास संशयास्पद हालचाली ओळखण्यासह संभाव्य धोके वेळीच लक्षात घेऊन तातडीने प्रतिसाद देणे शक्य होईल," असे प्रतिपादन महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचे संचालक व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अग्निशमन अधिकारी संतोष वारिक यांनी केले. 'एआय'मुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम, प्रभावी आणि सुसज्ज होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.



पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स व अमेरिकन सोसायटी फॉर इंडस्ट्रियल सिक्युरिटी (एएसआयएस) यांच्या संयुक्त विद्यमाने 'एआय इन सिक्युरिटी' संकल्पनेवर 'पीएसपी-एएसआयएस कॉन्क्लेव्ह'चे आयोजन केले होते. यामध्ये 'अग्निसुरक्षेमध्ये एआयचा वापर' यावर वारिक बोलत होते. मुंबईतील आयकॉनिका हॉटेल येथे झालेल्या कार्यक्रमावेळी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचे सहसंचालक किरण हत्याल, 'पीएसपी'चे सहसंस्थापक सुनील बीडलम व मंगेश काटे, बँक ऑफ बडोदाच्या सुरक्षा विभागाचे राष्ट्रीय प्रमुख ब्रिगेडियर प्रीतपाल सिंग, सिक्युरिटी शेल्स इंफोटेकचे संचालक महेश गव्हाणे, बायॉन अनॅलिटीक्सचे व्यवस्थापकीय संचालक राजीव नायर, सुरक्षा सेवा क्षेत्रातील प्रमुख अधिकारी नंदकिशोर भट, मोहित भूराणि, कुणाल भोगल, स्वप्नील कुटे, सुमित शहा, ब्रिगेडियर सुनील कुमार, सिमएक्सचे पूर्वेस गडा, 'एएसआयएस' मुंबई चॅप्टरचे समीर कुमार झा, मार्श मिरांडा, प्रमोद भिलारे, राकेश खेरवा, संपत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. एचएसबीसी बँक इंडियाचे उपाध्यक्ष (प्रोटेक्टिव्ह सिक्युरिटी) निलेश गाडेकर व हॉटेल ग्रँड हयात मुंबईचे सहायक सुरक्षा व्यवस्थापक संतोष भालके यांना सुरक्षा सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

संतोष वारिक म्हणाले, "सद्यस्थितीत इमारतींची सुरक्षा आणि आगीपासून बचाव (फायर सेफ्टी) या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या बनल्या आहेत. कारखाने, कार्यालये किंवा मॉलमध्ये लोकांच्या गर्दीवर लक्ष ठेवण्यासह संपूर्ण व्यवस्थापन 'एआय'च्या माध्यमातून करणे शक्य झाले आहे. तसेच, इमारतींमधील आगीच्या सुरक्षेच्या यंत्रणांवरही 'एआय'द्वारे नजर ठेवता येणे सहज शक्य आहे. शासनाने 'महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अँड लाइफ सेफ्टी मेजर्स ॲक्ट'मध्ये २०२३ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. इमारतीमध्ये आगीच्या सुरक्षेसाठी बसवलेले डिटेक्शन सिस्टीम्स, अलार्म, हायड्रंट्स आणि स्प्रिंकलर सेन्सर्सद्वारे आपत्कालीन स्थितीत अलर्ट पाठवले जातात. त्यामुळे कोणत्याही दुर्घटनेवेळी अग्निशमन दलाचा प्रतिसाद लवकर मिळण्यास मदत होईल."

प्रास्ताविकात सुनील बीडलम यांनी सांगितले की, पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स (पीएसपी) फोरम हे पुण्यातील कॉर्पोरेट, औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सुरक्षा, रिस्क मॅनेजमेंट आणि ऍनालिसिस करणाऱ्या व्यावसायिकांना एकत्र आणणारे व्यासपीठ आहे. सुरक्षा व्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या भू-राजकीय घडामोडी, सुरक्षारक्षकांशी संबंधित आव्हाने, प्रवेश नियंत्रण प्रणाली, आपत्कालीन स्थितीतील सज्जता यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा केली जाते. पुण्यासह मुंबई आणि अन्य शहरांत या स्वरूपाचे कार्यक्रम घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. 'सुरक्षा अवॉर्ड्स'सारख्या उपक्रमांद्वारे सुरक्षा आणि जोखीम व्यवस्थापनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरवही फोरमतर्फे केला जातो."

ब्रिगेडियर प्रीतपाल सिंग म्हणाले, "एआयच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि भविष्यातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी दिशा मिळाली. आज लहान-मोठ्या सर्वच गोष्टी इंटरनेटशी जोडल्या गेल्या आहेत. इंटरनेटमुळे एआयसारखे प्रभावी तंत्रज्ञान उपलब्ध झाले असले, तरी त्यावर योग्य नियंत्रण नसल्यास गैरप्रवृत्तींचे लोक त्याचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर करू शकतात. त्यामुळे सुरक्षा क्षेत्रातील व्यावसायिकांनी एआयचे स्वरूप समजून घेणे, त्याचा योग्य वापर करणे आणि संस्थांची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करता येईल, याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे." सूत्रसंचालन मृणालिनी चतुर्वेदी यांनी केले. मंगेश काटे यांनी आभार मानले.

१४ व १५ नोव्हेंबरला श्रीकृष्ण मंदिर व महानुभाव आश्रमाचा वर्धापन दिन सोहळा

■ कोरेगावमूळ (दै. संध्या)

■ आचार्यश्रींची तुला, पंजाबी कुळाचा स्नेहमेळावा, पंचावतार उपहार, अमृतमहोत्सव आणि दीक्षाविधीसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील शिक्रापूर येथील श्रीकृष्ण मंदिर व महानुभाव आश्रमाचा ४३ वा वर्धापन दिन सोहळा शनिवार, दि. १४ आणि रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी धार्मिक व आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. या दोन दिवसीय सोहळ्यानिमित्त आचार्यश्रींची तुला, महानुभावीय पंजाबी कुळाचा स्नेहमेळावा, पंचावतार उपहार, महंत कृष्णराज महंती, अमृतमहोत्सव, दीक्षाविधी, मिरवणूक आणि महंतिप्रतिष्ठा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीकृष्ण मंदिर व महानुभाव आश्रम परिसरात होणाऱ्या या सोहळ्यास महानुभाव पंथातील संत-महंत, आचार्य, तपस्विनी, नामधारक, सद्भक्त आणि शिष्य परिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या वेळी कवीश्वर कुलाचार्य तथा अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत कारंजेकर बाबा, उपाध्य कुलाचार्य तथा परिषदेचे कार्याध्यक्ष महंत बिडकर बाबा आणि रणाईचे सह संवत्सर येथील महंत राजधर बाबा यांच्यासह पुणे जिल्हा महानुभाव परिषदेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. महानुभाव पंथाच्या परंपरेनुसार या दोन दिवसांत विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. या माध्यमातून पंथाची समृद्ध परंपरा, भक्तिभाव, धार्मिक संस्कार आणि आध्यात्मिक विचारांचे दर्शन घडणार आहे. तसेच महानुभाव पंथाच्या परंपरेचे जतन व संवर्धन, आध्यात्मिक विचारांचा प्रसार आणि भक्त परिवारातील स्नेह, एकोपा व धार्मिक जिव्हाळा वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या वर्धापन दिन सोहळ्याला विशेष महत्त्व आहे.

महिलांनी आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज - डॉ. विद्या भोसले

■ चाकण (दै. संध्या)

कोणताही आजार अंगावर सहन न करता महिलांनी आरोग्याकडे लक्ष देण्याची नितांत गरज असल्याचे विचार डॉ. विद्या भोसले यांनी येथे व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ चाकण, रोटरी क्लब ऑफ चाकण एअरपोर्ट आणि श्रद्धा हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबीर प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. भोसले बोलत होत्या. मेनोपॉज व हाडांच्या आरोग्य तपासणी शिबिराचा दोनशे महिलांनी लाभ घेतला. या शिबिरात मेनोपॉजच्या काळातील शारीरिक बदल, हाडांचे आरोग्य, हाडांची घनता, वाढत्या वयानुसार हाडांची होणारी झीज आणि ऑस्टिओपोरोसिस यांविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सहभागींसाठी हाडांच्या घनतेची तपासणी, रक्त तपासणी व आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला.



या कार्यक्रमाला रोटरीचे जिल्हा ३१३१ चे प्रांतपाल नितीन ढमाले, डॉ. निलम ढमाले, डॉ. रावसाहेब आवटे, डॉ. संपत केदारे, चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले, सचिव डॉ. भरत राऊत आदी उपस्थित होते. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. लता त्रिंबके यांनी मेनोपॉजविषयी, तर अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुहास कांबळे यांनी हाडांचे आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. विद्या भोसले यांनी पुढे सांगितले की," महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. कोणताही आजार अंगावर सहन न करता त्याची वेळेवर तपासणी करून तज्ज्ञांचा सल्ला घेण्याची आवश्यकता आहे." या उपक्रमासाठी श्रद्धा हॉस्पिटल, समृद्धी लॅब, मुंगसे लॅब आणि मोतीलाल सांकला यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले यांनी सांगितले.

चाकण रोटरी क्लबचे अध्यक्ष किशोर भोसले यांनी सांगितले की, " महिलांची आरोग्याविषयक जागरूकता वाढविणे व प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे, यासाठी आरोग्य शिबिरांची गरज असते. हा या आरोग्य शिबिराचा प्रमुख उद्देश होता. भविष्यकाळात असेच नवनवीन उपक्रम राबवून महिलांच्या आरोग्याला जास्तीत जास्त प्राधान्य दिले जाणार आहे."

डॉ. प्रज्ञा भवारी यांनी सूत्रसंचालन केले. किशोर भोसले यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भरत राऊत यांनी आभार मानले.

येरवडा खुल्या कारागृहात मोफत नेत्र तपासणी शिबिर; ४६ जणांची तपासणी

■ पुणे (दै. संध्या)

येरवडा खुले कारागृह आणि डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर, माणिकबाग, सिंहगड रस्ता यांच्या संयुक्त विद्यमाने 'दृष्टी सुरक्षित, भविष्य उज्ज्वल!' या संकल्पनेतून मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या ३६ शिक्षाबंदींसह १० कर्मचाऱ्यांची, अशा एकूण ४६ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. शिबिरादरम्यान तपासणी करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याविषयी आवश्यक समुपदेशन, उपचार आणि पुढील वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. नेत्रविकारांचे वेळेत निदान व्हावे आणि योग्य उपचारांद्वारे दृष्टीचे संरक्षण व्हावे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरच्या सल्लागार व व्यवस्थापक अश्विनी पवार, ऑप्टोमेट्रिस्ट ऋतुजा गाडेकर आणि जयंत जाधव यांनी शिबिरात सहभागी होऊन नेत्र तपासणी केली. तसेच उपस्थितांना डोळ्यांची नियमित तपासणी, नेत्रविकारांची लक्षणे आणि वेळेवर उपचार घेण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे शिक्षाबंदी आणि कारागृह कर्मचाऱ्यांमध्ये नेत्र आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला आणि उपचारांची दिशा मिळाल्याने शिबिराचा लाभ सहभागी व्यक्तींना झाला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी निशा श्रेयकर, कार्यालयीन अधीक्षक नीता उके, वरिष्ठ लिपिक गोविंद गावडे, लिपिक प्रविण खुस्पे, मिश्रक अभिषेक रौंधळ, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, बालाजी सावंत, सुनील गायकवाड, हवालदार प्रकाश भोसले, राजेंद्र धनगर, वैशाली थोरात, लता पिसे, शिपाई शैला कदम, सुरेखा म्हेत्रे, वैभव पाटील आणि अशोक होले यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी सुरक्षा व्यवस्था, समन्वय आणि नियोजनाची जबाबदारी पार पाडली.



मुकुंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा

■ मुकुंदनगर (दै. संध्या)

तरुण वर्ग व्यसनाच्या आहारी जात असल्याने त्यांचे संसार उदध्वस्त होत आहे. तरुण पिढी व्यसनांपासून दूर रहावी. परिसरात निरोगी सामाजिक वातावरण निर्माण व्हावे, या उद्देशाने मुकुंदनगर, गोविंदपुरा, फकीरवाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाने पुढाकार घेण्याचे ठरविले आहे. मुकुंदनगर, गोविंदपुरा, फकीरवाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. मेजर गयास मिर्झा, डॉ. जी. पी. शेख, ॲड. हनिफ शेख आदी उपस्थित होते. या सभेत परिसरात व्यसनमुक्ती अभियान राबविणे, अपूर्ण सभागृहाचे काम पूर्ण करणे, ज्येष्ठ विधवा महिला व पुरुषांच्या पुनर्विवाहासाठी पुढाकार घेणे, तसेच संघाच्या कामकाजाला अधिक गतिमान करण्यासाठी नवीन कार्यकारिणी नियुक्त करणे, असे महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात आले. नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी उस्मान मिया शेख यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी रऊफ मोहम्मद शेख आणि आलम शफी खान, कार्याध्यक्षपदी आरिफ शेख, सचिवपदी फकीर मोहम्मद इमाम, सहसचिवपदी मिर्झा नवेद अंजुम आणि इस्माईल शेख, तर खजिनदारपदी अब्दुल सईद हाफीज यांची नियुक्ती करण्यात आली.

रेड लाइन-ब्लू लाइन प्रश्नावर तोडग्यासाठी 'बीएआय'चा पुढाकार

गुजरातच्या धर्तीवर 'यूडीसीपीआर'मध्ये सुधारणा करण्याची महानगरपालिका, नगररचना विभागाकडे मागणी

■ पुणे (दै. संध्या)

रेड लाइन-ब्लू लाइन निर्बंधांमुळे रखडलेल्या बांधकाम परवानग्या आणि पुनर्विकास प्रकल्पांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (बीएआय) पुढाकार घेतला आहे. गुजरातच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत (यूडीसीपीआर) सुधारणा करून पात्र प्रकरणांतील बांधकाम परवानग्यांचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

'बीएआय'चे सदस्य व राष्ट्रपती पुरस्कार विजेते राम (नंदकिशोर) पातकर यांच्या नेतृत्वाखाली 'बीएआय'चे पदाधिकारी व बांधकाम क्षेत्रातील प्रतिनिधींनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि नगररचना विभागाचे संचालक जितेंद्र भोपळे यांची भेट घेऊन या प्रश्नावर चर्चा केली. रेड लाइन-ब्लू लाइन निर्बंधांमुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासातही अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.



यावेळी 'बीएआय'चे माजी उपाध्यक्ष आनंद गुप्ता, बीएआय पुणे सेंटरचे सचिव महेश राठी, महाराष्ट्र 'युडीसीपीआर' समितीच्या सह-अध्यक्ष ज्योती चौगुले, पदाधिकारी मिहिर पायलेकर, लक्ष्मण विसपुते आदी उपस्थित होते. 'यूडीसीपीआर'मधील कलम ३.१.३ आणि ११.२.८ यांचा पुनर्विचार करून आवश्यक सुधारणा कराव्यात, तसेच संबंधित समितीचा अहवाल शासनाकडे लवकर सादर करावा, अशी मागणी करण्यात आली. राम (नंदकिशोर) पातकर म्हणाले, "गुजरातमधील कलम २७ च्या धर्तीवर महाराष्ट्रातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमध्ये पात्र प्रकरणांसाठी व्यवहार्य उपाययोजना करावी. नदी परिसरातील विकासासंदर्भातील निर्बंध आणि लागू नियमांचा पुनर्विचार करून पुनर्विकास प्रकल्पांसाठी आवश्यक धोरणात्मक उपाययोजना कराव्यात. पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांचे हित यांचा समतोल राखून या प्रश्नावर व्यवहार्य तोडगा काढण्याची आम्ही प्रयत्न करू."

या प्रश्नावर सकारात्मक व धोरणात्मक निर्णय झाल्यास नागरिकांचे संभाव्य आर्थिक नुकसान टाळण्यास, पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्यास आणि बांधकाम क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न सोडविण्यास निश्चितच मदत होऊ शकते, असे ज्योती चौगुले यांनी नमूद केले. पर्यावरण संरक्षणाचे निकष कायम ठेवून नागरिकांचे हित जपणारे स्पष्ट धोरण निश्चित करावे, असेही त्या म्हणाल्या. आनंद गुप्ता व महेश राठी यांनी बांधक्षम क्षेत्रातील विविध समस्या व मुद्दे मांडत त्या सोडविण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची मागणी केली. दरम्यान, आयुक्त नवल किशोर राम व जितेंद्र भोपळे यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित यंत्रांमधील वरिष्ठ स्तरावर चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.